# महाराष्ट्र शासन
## आदिवासी विकास विभाग




**“अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शहरातील इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळांमध्ये शिक्षण देणे”**

## मूल्यमापन अहवाल

**आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,**
**२८ क्वीन्स गार्डन, पुणे ४११००१**

# प्रस्तावना

महाराष्ट्रातील आदिवासी समाजाचा जीवनस्तर उंचविण्यासाठी वेगवेगळ्या योजना राबविण्यात येतात. या योजनांच्या लाभांचे आदिवासींची आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक स्थिती, प्रगती, आरोग्य इत्यादींवर झालेला परिणाम/बदल याबाबतचे मूल्यमापन आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे मार्फत करण्यात येते.

अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांचा कल इंग्रजी माध्यमांकडे थोडया प्रमाणात वाढत असला तरी सद्यस्थितीतील त्यांना शासकिय आश्रमशाळेत अपेक्षित दर्जाचे इंग्रजी शिक्षण मिळत नाही हे देखील गंभीर वास्तव आहे. तसेच शहरातील इंग्रजी माध्यमाच्या नामांकित शाळेत शिक्षण घेणे त्यांच्या आर्थिक कुवती पलिकडे होत आहे. ही बाब लक्षात येता अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शहरातील इंग्रजी माध्यमांच्या नामांकित निवासी शाळांमध्ये शिक्षण घेण्याची संधी मिळावी यासाठी "इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळांमध्ये शिक्षण देणे" ही योजना सुरु करण्यास आदिवासी विकास विभागाने मान्यता देण्यात आली आहे.

नामांकित शाळेतील अनुसूचित जमातीतील विद्यार्थ्यांना पुरविल्या जाणाऱ्या शैक्षणिक व अशैक्षणिक सोयीसुविधांची पाहणी करणे, अनुसूचित जमातीतील विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास घडवुन आणण्यासाठी तसेच शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी शालेय व्यवस्थापनाकडून राबविल्या जाणाऱ्या विशेष उपक्रमांची पाहणी करणे, इंग्रजी माध्यमाच्या शिक्षणामुळे शैक्षणिक गुणवत्तेत वाढ झालेली आहे किंवा नाही हे तपासणे, इंग्रजी माध्यमाच्या नामांकित शाळेतील सर्वसाधारण विद्यार्थी व अनुसूचित जमातीचे प्रवेशित विद्यार्थ्यांना शिक्षण,वर्ग, निवास व भोजन व्यवस्था एकत्रित असल्याच्या परीणामांची पाहणी करणे व योजनेच्या अंमलबजावणीबाबत येणाऱ्या अडचणी व त्रुटींचा शोध घेणे इ. उद्देश पुढे ठेऊन सदर योजनेचे मूल्यमापन करण्यात आले आहे.

मूल्यमापन अहवालासंबंधीची प्रश्नावली तयार करणे, प्राथमिक माहिती मिळविणे व आलेल्या माहितीचे तक्तीकरण आणि पृथ:करण करण्याची कामे श्री. हंसध्वज सोनवणे, उपसंचालक (ए.क्षे.वि.का.) यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. चंद्रशेखर पावसे (संशोधन अधिकारी), श्रीमती लीना पाटील (सांख्यिकी अधिकारी), श्रीमती शीतल सोंजे (संशोधन सहयोगी), श्रीमती संजीवनी काठे (संशोधन सहायक), श्री. मनोज घोरपडे (संशोधन सहायक), व श्री. संतोष सपकाळ (अन्वेषक) यांनी पूर्ण केलेले आहे. मूल्यमापन अहवाल लेखनाचे काम श्री. हंसध्वज सोनवणे, उपसंचालक (ए.क्षे.वि.का.) व श्री श्रीकांत धर्माळे (सांख्यिकी सल्लागार) यांचे मार्गदर्शनाखाली श्री. चंद्रशेखर पावसे (संशोधन अधिकारी), श्रीमती लीना पाटील (सांख्यिकी अधिकारी) व श्रीमती शीतल सोंजे (संशोधन सहयोगी) यांनी पूर्ण केले आहे.

सदर मूल्यमापन पाहणी अहवालाचा आदिवासी विकास विभागाअंतर्गत असलेल्या सर्व इंग्रजी माध्यमाच्या नामांकित शाळांमध्ये त्यांच्या समस्या सोडविणे व पुढील काळात करावयाच्या उपाययोजना करणेसंबंधीची कार्यवाही करण्यास मदत होईल अशी अपेक्षा आहे.

दिनांक : 2. 3. 2020
ठिकाण : पुणे

(नंदिनी आवडे)
आयुक्त
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे – ०१

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | प्रकरण | विषय | पान क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | | प्रस्तावना | i |
| २. | | अनुक्रमणिका | ii |
| ३. | | तक्त्यांची यादी | iv |
| ४. | | आकृत्यांची यादी | v |
| ५. | **प्रकरण पहिले** | **योजनेची माहिती -** | **१ - ५** |
| | | प्रस्तावना | १ |
| | | योजनेचे स्वरूप | १ - ४ |
| | | योजनेच्या अटी व शर्ती | ४ - ५ |
| | | योजनेचे लाभार्थी | ५ |
| | | योजनेची व्याप्ती | ५ |
| | | संनियंत्रण | ५ |
| ६. | **प्रकरण दुसरे** | **मूल्यमापन कार्यपध्दती -** | **६ - ८** |
| | | मुल्यमापनाचा उद्देश | ६ |
| | | कार्यपध्दती व नमूना निवड | ६ - ८ |
| ७. | **प्रकरण तिसरे** | **पृथ:करण** | **९ - १७** |
| ८. | **प्रकरण चौथे** | **शैक्षणिक सोयीसुविधा -** | **१८ - २३** |
| | | वर्गखोल्या | १८ |
| | | ग्रंथालय | १९ |
| | | संगणक कक्ष | १९ |
| | | डिजिटल कक्ष | २० |
| | | प्रयोगशाळा | २० |
| | | क्रीडांगण | २१ |
| | | शैक्षणिक साहित्य | २२ |
| | | सांस्कृतिक सभागृह | २२ |
| | | शैक्षणिक दर्जा | २३ |
| ९. | **प्रकरण पाचवे** | **अशैक्षणिक सोयीसुविधा -** | **२४ - २९** |
| | | निवासव्यवस्था | २४ - २५ |
| | | वसतिगृह अधीक्षक | २६ |
| | | अभ्यासकक्ष | २६ |
| | | वैयक्तिक वापराच्या साहित्याचा पुरवठा | २७ |
| | | वैद्यकीय सोयीसुविधा | २८ |
| | | भोजनव्यवस्था | २८ |

| अ.क्र. | प्रकरण | विषय | पान क्रमांक |
|---|---|---|---|
| १०. | **प्रकरण सहावे** | **शालेय उपक्रम -** | **३० - ३४** |
| | | इंग्रजी शिकवणी वर्ग | ३० |
| | | इंग्रजी हस्ताक्षर /वाचन/निबंध स्पर्धा | ३० |
| | | समूह अवांतर वाचन | ३१ |
| | | द्विभाषिक शिक्षक | ३१ |
| | | सांस्कृतिक कार्यक्रम | ३१ |
| | | पालक मेळावा | ३२ |
| | | क्रिडास्पर्धा | ३२ |
| | | नृत्य व संगीत शिक्षण | ३२ |
| | | शालेय सहल | ३३ |
| | | योगाभ्यास | ३३ |
| | | शिष्यवृत्ती | ३३ |
| | | विज्ञान प्रदर्शन | ३३ |
| ११. | **प्रकरण सातवे** | **अडचणी व उपाययोजना** | **३५ - ३८** |
| १२. | | **प्रपत्रे (प्रश्नावली)** | **३९ - ६४** |

# तक्त्यांची यादी


| अ.क्र. | विषय | पान क्रमांक |
|---|---|---|
| १. | विद्यार्थ्यांसाठी शासनाने निर्धारित केलेला शुल्क | ३ |
| २. | नामांकित शाळांचे गुणांकन | ४ |
| ३. | अपर आयुक्त कार्यालय अंतर्गत कार्यरत असणाऱ्या नामांकित शाळांची माहिती | ७ |
| ४. | मूल्यमापनासाठी निवडण्यात आलेल्या नामांकित शाळा | ७ - ८ |
| ५. | इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळेत अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांची वर्षनिहाय संख्या | ९ |
| ६. | राज्यातील अपर आयुक्तालय निहाय नामांकित शाळेतील अनुसूचित जमातीतील विद्यार्थी संख्या | १० |
| ७. | राज्यातील नाशिक अपर आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रामध्ये येणाऱ्या इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळेत प्रकल्पनिहाय अनुसूचित जमातीतील विद्यार्थ्यांची संख्या | १२ |
| ८. | राज्यातील ठाणे अपर आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रामध्ये येणाऱ्या इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळेत प्रकल्पनिहाय अनुसूचित जमातीतील विद्यार्थ्यांची संख्या | १३ |
| ९. | राज्यातील अमरावती अपर आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रामध्ये येणाऱ्या इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळेत प्रकल्पनिहाय अनुसूचित जमातीतील विद्यार्थ्यांची संख्या | १४ |
| १०. | राज्यातील नागपूर अपर आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रामध्ये येणाऱ्या इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळेत प्रकल्पनिहाय अनुसूचित जमातीतील विद्यार्थ्यांची संख्या | १५ |
| ११. | इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळेतील एकूण एकंदरीत व अनुसूचित जमातीची विद्यार्थीसंख्या (शैक्षणिक वर्ष २०१७-१८) | १६ |
| १२. | शैक्षणिक साहित्य | २२ |
| १३. | वैयक्तिक वापराच्या साहित्याचा पुरवठा | २७ |

# आकृत्यांची यादी


| अ.क्र. | विषय | पान क्रमांक |
|---|---|---|
| १. | अपर आयुक्तालय निहाय शहरातील इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळेत अनुसूचित जमातीतील मुले/मुली | १० |
| २. | अपर आयुक्तालय निहाय शहरातील इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळेत अनुसूचित जमातीतील विद्यार्थी (%) | ११ |
| ३. | नाशिक अपर आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रामध्ये येणाऱ्या शहरातील इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळेत अनुसूचित जमातीतील विद्यार्थी संख्या (शैक्षणिक वर्ष २०१७-१८ अखेर) | १२ |
| ४. | ठाणे अपर आयुक्त कार्यालयाच्या कार्यक्षेत्रामध्ये येणाऱ्या शहरातील इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळेत अनुसूचित जमातीची विद्यार्थीसंख्या (शैक्षणिक वर्ष २०१७-१८अखेर) | १३ |
| ५. | अमरावती अपर आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रामध्ये येणाऱ्या शहरातील इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळेत अनुसूचित जमातीतील विद्यार्थीसंख्या (शैक्षणिक वर्ष २०१७-१८ अखेर) | १४ |
| ६. | नागपूर अपर आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रामध्ये येणाऱ्या शहरातील इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळेत अनुसूचित जमातीतील विद्यार्थीसंख्या (शैक्षणिक वर्ष २०१७-१८अखेर) | १५ |

# प्रकरण- १
# योजनेची माहिती

**१.१ प्रस्तावना :**

महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जमातीची लोकसंख्या १०५.१० लक्ष म्हणजेच एकूण ११२३.७४ लक्ष लोकसंख्येच्या ९. ३५% आहे. महाराष्ट्र राज्यात अनुसूचित जमातीतील साक्षरतेचे प्रमाण ६५.७३% असून पुरूष साक्षरता ७४.२७% व स्त्री साक्षरता ५७.३ % आहे. साक्षरतेच्या या प्रमाणानुसार बहुसंख्य आदिवासी लोकसंख्या साक्षर ठरत असली तरी आदिवासी तरुणांमध्ये उच्च शिक्षणाचा अभाव असण्याची वस्तुस्थिती आहे. उच्च शिक्षणात इंग्रजीचा वापर जास्त होत असल्याने अनुसूचित जमातीचे विद्यार्थी उच्च शिक्षणात मागे पडत आहेत. सुरुवातीपासुनच इंग्रजी माध्यमातील शिक्षणाअभावी आदिवासी विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणातील बदललेल्या वातावरणाशी जुळवून घेणे कठीण होत आहे, असे म्हणणे वावगे ठरणार नाही.

जागतिकीकरणाच्या सध्याच्या वातावरणात सेवा क्षेत्राचे महत्व अनन्य साधारण झाले आहे. देशाच्या एकूण सकल राष्ट्रीय उत्पन्नामध्ये सेवाक्षेत्राचा वाटा ६०% हून अधिक आहे.वर्तमानकाळात कोणत्याही स्तरावर नोकरी मिळण्याची शक्यता याच क्षेत्रात असल्यामुळे या क्षेत्राच्या प्रवाहात सहभागी होणे महत्वाचे ठरले आहे. यामुळेच सेवाक्षेत्रात इंग्रजी भाषेस पर्याय नाही.

अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांचा कल इंग्रजी माध्यमांकडे थोडया प्रमाणात वाढत असला तरी सद्यस्थितीतील त्यांना शासकिय आश्रमशाळेत अपेक्षित दर्जाचे इंग्रजी शिक्षण मिळत नाही हे देखील गंभीर वास्तव आहे.तसेच शहरातील इंग्रजी माध्यमाच्या नामांकित शाळेत शिक्षण घेणे त्यांच्या आर्थिक कुवती पलिकडे होत आहे. ही बाब लक्षात येता अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शहरातील इंग्रजी माध्यमांच्या नामांकित निवासी शाळांमध्ये शिक्षण घेण्याची संधी मिळावी यासाठी ही योजना सुरु करण्यात आली आहे.

**१.२ योजनेचे स्वरुप :**

या पार्श्वभूमीवर आदिवासी विकास विभाग शासन निर्णय क्रमांक शाआशा -२००८/प्र. क्र. ८१/का-१३ दिनांक २८ऑगस्ट २००९ अन्वये अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना दरवर्षी त्यांच्या निवासाच्या जवळ असणाऱ्या शहरातील इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळांमध्ये इयत्ता१ली पासून इयत्ता१२वी पर्यंत इतर सर्वसाधारण विद्यार्थ्यांसोबतच शिक्षण घेण्यास मान्यता देण्यात आली आहे. ज्याअर्थी आदिवासी मुलांना नामांकित अशा इंग्रजी माध्यमाच्या निवासी शाळेत शिक्षण देण्यासाठी हि योजना सुरु केली आहे त्याअर्थी शाळेची निवड करण्याची मूळ संकल्पना योजनेच्या नावातच स्पष्ट आहे. या योजनेत संमिलित होण्यासाठी नामांकित शाळेचे निकष पुर्ण करणाऱ्या इंग्रजी माध्यमाच्या शाळांकडून ऑनलाईन पध्दताने अर्ज मागविण्यात येतात. प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी खालील निकषांवर करण्यात येते.

१. शाळेमधील मुख्याध्यापक हे पुर्णवेळ असावे.

२. नामांकित निवासी इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील किमान ९०% शिक्षकांचे शिक्षण हे इंग्रजी माध्यमातून झालेले असावे.तसेच सर्व शिक्षक अर्हता प्राप्त असावे.

३. नामांकित निवासी इंग्रजी माध्यमाच्या शाळेमधून इयत्ता दहावीच्या कमीत कमी तीन बॅच उत्तीर्ण झालेल्या असाव्यात.

४. शाळेमध्ये प्रत्येक वर्ग तसेच अतिरिक्त तुकडयांकरिता स्वतंत्र वर्गखोल्या असणे आवश्यक आहे.

५. प्रत्येक वर्गखोलीमध्ये विद्यार्थी पटसंख्येनुसार पुरेसे बेंचेस् आवश्यक आहेत.

६. शाळेमध्ये भौतिकशास्त्र, जीवशास्त्र व रसायनशास्त्र प्रयोगशाळा असाव्यात. तसेच सदर प्रयोगशाळांसाठी अर्हता धारक प्रयोगशाळा सहाय्यक असावे.

७. शाळेमध्ये ग्रंथालय ,संगणक, प्रयोगशाळा, क्रिडा, संगीत, कला इत्यादी करिता स्वतंत्र वर्गखोल्या असाव्यात, तसेच विद्यार्थी संख्येनुसार पुरेशा क्षमतेचे सांस्कृतिक सभागृह असावे.

८. शाळेत पुर्णवेळ प्रशिक्षित संगणक तज्ञ,क्रिडा प्रशिक्षक,संगीत शिक्षक व कला शिक्षक असणे आवश्यक आहे

९. शाळेमध्ये कमीतकमी दोन डिजीटल क्लासरुम असाव्यात.

१०. शाळेच्या शैक्षणिक संकुलाची इमारत व वसतिगृह इमारत या दोन वेगवेगळया इमारत असाव्यात.

११. शाळेमध्ये जलशुध्दीकरण यंत्र,CCTV cameras असावे.

१२. शाळेमध्ये आजारी विद्यार्थ्यांसाठी एक sick room असावी.

१३. नामांकित योजनेअंतर्गत निवडलेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी स्वंतत्र तुकडी न करता इतर विद्यार्थ्यांसोबत शिक्षण देण्यात यावे.

यानुसार आदिवासी आयुक्त कार्यालयामार्फत या शाळांची पाहणी करण्यात येते. आयुक्त,आदिवासी विकास नाशिक हे शाळांच्या निवडीबाबतचा प्रस्ताव सचिव स्तरीय समितीस सादर करतात.अ) शाळेची स्थापना कधी झाली, ब) शाळेत देण्यात येणाऱ्या सोयी-सुविधा,क) शाळांचे मागील तीन वर्षाचे निकाल,ड) मागील तीन वर्षाचे बॅक स्टेटमेंट तसेच मागील तीन वर्षाचे लेखा परीक्षण अहवाल इ) शाळांमध्ये अभ्यासक्रमाव्यतिरिक्त शिकविण्यात येणाऱ्या इतर बाबी,फ) शालेय शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्या शाळेतील विद्यार्थ्यांनी केलेली प्रगती अथवा घेतलेले व्यावसायिक शिक्षण इ. बाबींची माहिती विचारात घेवून सदर समिती सर्वोत्तम शाळांच्या निवडीस अंतिम मान्यता देते.तसेच मान्यता प्राप्त शाळांसोबत प्रकल्प कार्यालयामार्फत करारनामा करण्यात येतो.या करारनाम्यात संस्थेकडून सर्व अटी व शर्तींचे पालन करण्यात येईल असे नमूद करण्यात येते.त्यानुसार प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प हे विद्यार्थ्यांच्या व त्यांच्या पालकांच्या आवडीनुसार/प्राधान्यानुसार संबंधित विद्यार्थ्यास नामांकित शाळेत इयत्ता १ ली मध्ये प्रवेश मिळवून देतात.

सदर शाळांमध्ये या योजनेतून विद्यार्थ्यांना पूर्णपणे मोफत शिक्षण दिले जाते. शिक्षणाबरोबरच शालेय गणवेश, वह्या, पुस्तके, बुट, मोजे, रेनकोट, अंडर गारमेंटस, भोजन, निवासखर्च, ट्युशन फी, प्रवेश फी, सुरक्षा अनामत,शिक्षण शुल्क इत्यांदीसाठी देय असणारी रक्कम सबंधित प्रकल्प आधिकारी यांचे मार्फत संबंधित नामांकित शाळांना प्रदान करण्यात येते.विद्यार्थ्यांची देखभाल, शिक्षण, आरोग्य व प्रगती याची संपूर्ण जबाबदारी

सबंधित नामांकित शाळेची असते. संस्थेने आदिवासी विद्यार्थ्यांसाठी वेगळी तुकडी/ वर्ग सुरु करणे अपेक्षित नसुन सुरु असलेल्या तुकडी/ वर्गामध्येच आदिवासी विद्यार्थ्यांना प्रवेश देणे बंधनकारक आहे.

**अ) विद्यार्थ्यांसाठी शासनाने निर्धारित केलेला शुल्क :**

आदिवासी विकास विभाग शासन निर्णय दि.२१.४.२०१५ अन्वये नामांकित शाळांची खालीलप्रमाणे वर्गवारी करून शुल्क निश्चित करण्यात आले आहे. सदर बदल सन २०१५-२०१६ या शैक्षणिक वर्षापासुन अंमलात आले आहेत.

१. महानगरपालिका कार्यक्षेत्रातील शाळा रुपये ५०,०००/—

२. जिल्हास्तरीय मुख्यालय कार्यक्षेत्रातील शाळा रुपये ४५,०००/—

३. तालुकास्तरावरील /नगरपालिका क्षेत्रातील (जिल्हा मुख्यालय वगळून) व अन्य शाळा रुपये ४०,०००/—

४. महाबळेश्वर, पाचगणी, चिखलदरा, पन्हाळा, लोणावळा या थंड हवेच्या ठिकाणच्या शाळा रुपये ५०,०००/—

तथापि, सदर योजनेंतर्गत निश्चित कमाल शुल्कापेक्षा अधिक शुल्काची काही संस्थाची मागणी पाहता व योजनेत सुसुत्रता आणण्याकरीता सन २०१६-२०१७ या शैक्षणिक वर्षापासून शाळांची सोयीसुविधा व दर्जा नुसार गुणांकन करुन खालीलप्रमाणे सुधारीत शुल्क आदिवासी विकास विभाग शासन निर्णय दि.२७ जुन २०१६ अन्वये निर्धारीत करण्यात आलेले आहे.

**तक्ता क्र. १**

| अ.क्र. | एकुण गुण | प्रति विद्यार्थी मंजुर शुल्क |
|---|---|---|
| १ | ८० व त्यापेक्षा जास्त गुण | रु. ७०,०००/— वार्षिक किंवा प्रत्यक्ष फी यापैकी जे कमी असेल त्याप्रमाणे. |
| २ | ७०-७९ गुण | रू. ६०,०००/— वार्षिक किंवा प्रत्यक्ष फी यापैकी जे कमी असेल त्याप्रमाणे. |
| ३ | ६०-६९ गुण | रु. ५०,०००/— वार्षिक किंवा प्रत्यक्ष फी यापैकी जे कमी असेल त्याप्रमाणे |
| ४ | ६० पेक्षा कमी गुण | ६० पेक्षा कमी गुणांकन प्राप्त झालेल्या शाळांचे प्रस्ताव अपात्र ठरतील. |

स्त्रोत - आदिवासी विकास विभाग शासन निर्णय दि.२७ जुन २०१६ अन्वये.

**ब) नामांकित शाळांचे गुणांकन :**

नामांकित शाळेचे वर्गीकरण ३ श्रेणीत करण्यात आले आहे व त्यानुसार त्यांना मुलांच्या शैक्षणिक तसेच निवासी खर्चाबाबत संस्थाना दयावयाची अनुदानाची रक्कम निश्चित करण्यात येते हे वर्गीकरण करण्यासाठी शाळेद्वारे पुरविण्यात येणाऱ्या सुविधांबाबतच्या विविध मुद्दयांवर शाळेस गुण देण्यात येतात. दर्शविण्यात आलेल्या तक्यात संबंधित शाळेने प्राप्त केलेल्या गुणानुसार त्यांचे वर्गीकरण होते. सदर गुणांकनाबाबतचा प्रस्ताव संबंधित कागदपत्रासह प्रमाणित करुन मा.आयुक्त,आदिवासी विकास नाशिक यांना सादर करण्यात येतो. सदर प्रस्तावास

अंतिम मान्यता राज्यस्तरीय समिती देते. या गुणांकन प्रपत्रातील माहिती संबंधित शाळेच्या मुख्याध्यापक व संस्थाचालकाच्या स्वाक्षरीने प्रमाणित करुन देणे बंधनकारक आहे. शैक्षणिक वर्ष २०१७-१८मधील नामांकित शाळांचे गुणांकन करण्यात आले असून ते खालीलप्रमाणे.

**तक्ता क्र. २** (शैक्षणिक वर्ष २०१७-१८)

| **अ. क्र.** | **शहरातील इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळांना देण्यात येणारी श्रेणी** | **शहरातील इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी श्रेणीप्राप्त शाळांची संख्या** |
|---|---|---|
| १ | अ श्रेणी | २१ |
| २ | ब श्रेणी | ३४ |
| ३ | क श्रेणी | १३१ |
| **एकूण** | | **१८६** |

स्रोत-आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिक.

सदर योजनेंतर्गत नामांकित शाळांची गुणवत्ता कायम टिकून राहावी म्हणून उपरोक्त पध्दतीने गुणांकन प्रत्येक नवीन शैक्षणिक वर्ष सुरू होण्यापुर्वी करण्यात येते.त्यानुसार त्या शैक्षणिक वर्षाकरीता देय शुल्क निश्चितीचा निर्णय सचिव स्तरीय समितीच्या बैठकीत घेण्यात येतो. नामांकित शाळांमध्ये आदिवासी विद्यार्थांना प्रवेश देण्याबाबतचे निकष खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आले आहेत.

**१.३ योजनेच्या अटी व शर्ती** :

१. सदर योजनेचा लाभ घेऊ इच्छिणारा विद्यार्थी अनुसूचित जमातीचा असावा
२. विद्यार्थ्याच्या पालकाने विद्यार्थ्याच्या नावे सक्षम अधिकाऱ्याने दिलेल्या अनुसूचित जमातीच्या दाखल्याची साक्षांकित प्रत सादर करावी
३. जर विद्यार्थी दारिद्र्य रेषेखालील असेल तर त्यासंबंधिच्या यादीतील अनुक्रमांक नमूद करण्यात यावा
४. या योजनेचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या मुलांच्या पालकाच्या कुटूंबाची वार्षिक उत्पन्नाची कमाल मर्यादा रु. १.०० लाख इतकी आहे.
५. इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये आदिवासी विद्यार्थ्यांची स्वतंत्र तुकडी न करता त्यांना इतर मुलांसोबत एकत्रित शिक्षण देण्यात यावे.
६. निवासी शाळेत राहणाऱ्या विद्यार्थ्यांना वर्षातुन दोनदा पालकांना भेटण्यासाठी स्वग्रामी जाण्याकरीता प्रवासखर्च देण्यात यावा. तसेच वर्षातून दोनदा पालकांना आपल्या पाल्यांना शाळेत येऊन भेटण्याकरीता प्रवासखर्च देण्यात यावा. सदर प्रवासखर्च अदा करण्याची जबाबदारी संबंधित प्रकल्प अधिकाऱ्याची राहील.
७. आदिवासी विद्यार्थ्यांच्या निवासाची व्यवस्था वेगवेगळी न करता इतर मुलांसोबत एकत्रित करण्यात यावी.
८. आदिम जमातीच्या विद्यार्थ्यांना तसेच विधवा / घटस्फोटीत / निराधार/ परीत्यक्त्या व दारीद्रय

रेषेखालील कुटूंबातील अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना प्राधान्य दिले जाईल.

९. नामांकित शाळेत प्रवेश घेतल्यानंतर विद्यार्थी दरवर्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. विद्यार्थी अनुत्तीर्ण झाल्यानंतर त्याला नामांकित शाळेतून काढून टाकण्यात यावे.

## १.४ योजनेचे लाभार्थी :

प्रकल्प अधिकारी,एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प हे सभोवतालच्या गावातील इयत्ता१ली त प्रवेश घेण्यास पात्र असलेल्या विद्यार्थ्यांची जाहिर सुचनेद्वारे माहिती मागवितात. तसेच प्रत्येक शासकिय / अनुदानित आश्रमशाळांच्या पातळीवर या योजनेचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या मुलांची यादी,प्रवेश अर्ज व पालकांचे संमतीपत्र घेण्यात येते.त्यानंतर प्रत्येक प्रकल्प अधिकाऱ्याकडून विद्यार्थ्यांची निवड करण्यात येते. सदर योजनेंतर्गत विद्यार्थ्यांना इयत्ता १ली व इयत्ता २ री या टप्प्यावर प्रवेश देण्यात येतो.

## १.५ योजनेची व्याप्ती :

सदर योजनेंतर्गत आदिवासी विकास विभाग ,शासन निर्णय दि. २१ एप्रिल २०१५अन्वये आदिवासी विकास विभागामार्फत नामांकित शाळांमध्ये दरवर्षी पाठविण्यात येत असलेल्या २५०० विद्यार्थ्यांच्या संख्येत सन २०१५-१६या शैक्षणिक वर्षापासून १० पटीत वाढ करण्यात आली आहे. त्यानुसार या योजनेंतर्गत दरवर्षी २५००० विद्यार्थ्यांची निवड करण्याबाबत लक्षांक ठरविण्यात आलेला आहे.

सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षाअखेर सदर योजनेंतर्गत १८६ इतक्या इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळांमध्ये ५०६८८ इतके अनुसूचित जमातीचे विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

## १.६ संनियंत्रण :

इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळांची निवड करण्यासाठी तसेच शाळेचे शुल्क ठरविण्यासाठी खालील प्रमाणे सचिव स्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे.

१) मा.प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग – अध्यक्ष
२) मा. प्रधान सचिव, वित्त विभाग – सदस्य
३) मा.सचिव, शालेय शिक्षण विभाग – सदस्य

सदर योजनेची अंमलबजावणी प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांचे मार्फत शासन निर्णयाप्रमाणे करण्यात येते. सदर योजनेचे नियंत्रक अधिकारी, मा.आयुक्त,आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक हे आहेत. तसेच अपर आयुक्त आदिवासी विकास ठाणे/ नाशिक/ नागपुर/ अमरावती हे पर्यवेक्षकिय अधिकारी आहेत. सदर योजनेची योग्य अंमलबजावणी करुन योजना सफल करण्याची जबाबदारी संबंधित प्रकल्प अधिकारी व अपर आयुक्त,आदिवासी विकास यांची आहे.

# प्रकरण -२
# मूल्यमापन कार्यपध्दती

## २.१ मूल्यमापनाचा उद्देश :

उच्च शिक्षणातील इंग्रजीचा वाढता वापर तसेच जागतिकीकरणात इंग्रजीचे वाढते महत्व लक्षात घेवून अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांचा इंग्रजी माध्यमाकडे थोडयाफार प्रमाणात वाढत असणारा कल लक्षात घेवून अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना दरवर्षी शहरातील जवळच्या इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळांमध्ये इयत्ता १ली पासून इयत्ता १२वी पर्यंत शिक्षण देण्यास मान्यता देण्यात आली आहे. अशा "इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळांमध्ये शिक्षण देणे" या योजनेचे मूल्यमापन करण्यासाठी खालीलप्रमाणे उद्देश आहेत.

१) नामांकित शाळेतील अनुसूचित जमातीतील विद्यार्थ्यांना पुरविल्या जाणाऱ्या शैक्षणिक व अशैक्षणिक सोयीसुविधांची पाहणी करणे.

२) अनुसूचित जमातीतील विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास घडवुन आणण्यासाठी तसेच शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी शालेय व्यवस्थापनाकडून राबविल्या जाणाऱ्या विशेष उपक्रमांची पाहणी करणे.

३) इंग्रजी माध्यमाच्या शिक्षणामुळे शैक्षणिक गुणवत्तेत वाढ झालेली आहे किंवा नाही हे तपासणे.

४) इंग्रजी माध्यमाच्या नामांकित शाळेतील सर्वसाधारण विद्यार्थी व अनुसूचित जमातीचे प्रवेशित विद्यार्थ्यांना शिक्षण,वर्ग, निवास व भोजन व्यवस्था एकत्रित असल्याच्या परीणामांची पाहणी करणे.

५) योजनेच्या अंमलबजावणीबाबत येणाऱ्या अडचणी व त्रुटींचा शोध घेणे.

## २.२ कार्यपध्दती व नमूना निवड :

### अ) अपर आयुक्त कार्यालय अंतर्गत कार्यरत असणाऱ्या नामांकित शाळांची माहिती :

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,पुणे मार्फत राज्यातील "अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळांमध्ये शिक्षण देणे" या योजनेच्या मुल्यमापन अहवालासाठी महाराष्ट्रातील विविध विभागात असणाऱ्या इंग्रजी माध्यमाच्या नामांकित शाळांना भेटी देवून माहिती संकलित करण्यात आली. आदिवासी विकास विभागांतर्गत ठाणे/नाशिक/नागपूर/अमरावती याठिकाणी अपर आयुक्त कार्यालये कार्यरत आहेत. राज्यातील विविध विभागात असणाऱ्या नामांकित शाळांची माहिती पुढील तक्त्यात देण्यात आली आहे.

**तक्ता क्र. ३** (सन २०१७-१८)

| अ.क्र. | अपर आयुक्त कार्यालयाचे नाव | अनुसूचितक्षेत्रातील नामांकित शाळा | अनुसूचित क्षेत्राबाहेरील नामांकित शाळा |
|---|---|---|---|
| १) | नाशिक | ०७ | ४५ |
| २) | ठाणे | ०५ | ३१ |
| ३) | अमरावती | ०१ | ४८ |
| ४) | नागपूर | ०४ | ४५ |
| **एकूण** | | **१७** | **१६९** |

स्त्रोत - आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिक.

**ब) मूल्यमापनासाठी निवडण्यात आलेल्या नामांकित शाळा :**

अपर आयुक्त कार्यालयांतर्गत अनुसूचित क्षेत्रातील व अनुसूचित क्षेत्राबाहेरील नामांकित शाळांची निवड करण्यात आलेली आहे. जेणेकरुन भौगोलिक प्रतिनिधीत्वामध्ये योग्य संतुलन राखण्यात येईल. अशाप्रकारे राज्यात खालीलप्रमाणे एकुण १२ प्रकल्प कार्यालयांतर्गत येणाऱ्या १५ नामांकित शाळांची निवड करण्यात आलेली आहे.

**तक्ता क्र. ४**

| अ.क्र. | अपर आयुक्त कार्यालय | अनुसूचित क्षेत्राबाहेरील निवडण्यात आलेली इंग्रजी माध्यमाची नामांकित शाळा | प्रकल्प कार्यालय |
|---|---|---|---|
| १ | नाशिक | आदर्श इंग्लिश मिडीयम स्कुल, काकडगाव, नामपूर, ता.सटाणा, जि.नाशिक. | कळवण |
| २ | नाशिक | ओम गुरूदेव इंग्लिश मिडीयम गुरूकुल, कोकमठाण, ता.कोपरगाव, जि.अहमदनगर. | राजूर |
| ३ | नाशिक | एस.एन.डी. इंग्लिश मिडियम पब्लिक स्कूल, बाभुळगाव, ता.येवला, जि.नाशिक. | नाशिक |
| ४ | ठाणे | सुषमा पाटील विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, कामोठे, ता.पनवेल जि.रायगड. | पेण |
| ५ | ठाणे | कर्नाळा स्पोर्टस् ॲकॅडमी बार्न्स हायस्कूल व ज्युनियर कॉलेज, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड. | पेण |
| ६ | ठाणे | स्कॉलर फाउंडेशन हायस्कुल, पाचगणी, ता.महाबळेश्वर, जि.सातारा. | घोडेगाव |
| ७ | अमरावती | सरस्वती इंटरनॅशनल स्कुल, कुर्तडी, ता.कळमनुरी जि.हिंगोली. | कळमनुरी |
| ८ | नागपूर | ट्विंकल इंग्लिश मिडियम स्कुल, नागभिड, जि.चंद्रपूर. | चिमूर |

स्त्रोत - आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिक. (पुढील पानावर पहावे)

**तक्ता क्र. ४**

| अ.क्र | अपर आयुक्त कार्यालय | अनुसूचित क्षेत्रांतर्गत निवडण्यात आलेली इंग्रजी माध्यमाची नामांकित शाळा | प्रकल्प कार्यालय |
|---|---|---|---|
| १ | नाशिक | ब्रम्हाव्हॅली पब्लिक स्कूल व ज्युनिअर कॉलेज, अंजनेरी ता.त्र्यंबकेश्वर, जि.नाशिक | नाशिक |
| २ | नाशिक | डॉ.डी.एस.आहेर पब्लिक स्कूल विठेवाडी, ता.देवळा, जि.नाशिक | कळवण |
| ३ | नाशिक | राजे छत्रपती मार्शल आर्टस इंग्लिश मिडियम स्कूल, पिंपळनेर, ता.साक्री, जि.धुळे. | धुळे |
| ४ | ठाणे | आत्मा मालिक इंग्लिश मिडीयम स्कुल, CBSE, मोहिली, अघई, ता.शहापुर, जि.ठाणे. | शहापुर |
| ५ | ठाणे | आत्मा मालिक इंग्लिश मिडीयम स्कुल, अंबई, कंचाड, ता.वाडा., जि.पालघर. | जव्हार |
| ६ | अमरावती | मातोश्री कमलाताई ठमके इंग्लिश मिडीयम स्कुल, गोकुंदा, ता.किनवट, जि.नांदेड | किनवट |
| ७ | नागपूर | पॅरॉडाईज इंग्लिश मिडीयम स्कुल, आरमोरी, जि.गडचिरोली. | गडचिरोली |

स्रोत - आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिक.

# प्रकरण - ३

## पृथ:करण

सदर योजनेच्या कार्यन्वयनात विद्यार्थ्यांच्या संख्येस अतिशय महत्व आहे.योजनेतील नामांकित शाळांना दिले जाणारे अनुदान या संख्येनुसारच निर्धारित होते. या योजने अंतर्गत राज्यातील इंग्रजी माध्यमाच्या नामांकित शाळेत अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांची संख्या खालील तक्त्यात दिलेली आहे.

### ३.१ इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळेत अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांची वर्षनिहाय संख्या :

**तक्ता क्र. ५**

| अ. क्र. | अपर आयुक्त | वर्षनिहाय विद्यार्थीसंख्या | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७ | २०१७-१८ |
| १ | **नाशिक** | ५०९ | ६१६ | ९१८ | १३०६ | १४०२ | ३१०९ | ६२३९ | १८६८४ |
| २ | **ठाणे** | ६३८ | ५९० | ५७५ | ७९२ | ८०५ | ५९१९ | ५९८७ | ८५७२ |
| ३ | **अमरावती** | १९५ | ३१३ | ३८५ | ६७२ | ७०८ | ४४७८ | ५१३८ | १३३५८ |
| ४ | **नागपूर** | ३५० | ३७२ | ३४७ | ४३८ | ४६५ | ४६६६ | ३६५२ | १००७४ |
| **महाराष्ट्र राज्य एकूण** | | **१६९२** | **१८९१** | **२२२५** | **३२०८** | **३३८०** | **१८१७२** | **२१०१६** | **५०६८८** |

स्त्रोत-आदिवासी विकास आयुक्तालय,नाशिक

सदर योजना सुरू करण्यास सन २००९ -१० पासून मान्यता देण्यात आली आहे.तथापि सदर योजना सन २०१०-११ या शैक्षणिक वर्षापासून सुरू करण्यात आलेली आहे.सन २०१५-१६या शैक्षणिक वर्षापासून नामांकित शाळा योजनेंतर्गत दि.२१ एप्रिल २०१५च्या शासन निर्णयानुसार २५००० विद्यार्थी निवडीचे उद्दिष्टे देण्यात आल्याने सन २०१५-१६या शैक्षणिक वर्षापासून विद्यार्थीसंख्येत लक्षणीय वाढ होताना दिसते.

### ३.२ राज्यातील अपर आयुक्तालय निहाय नामांकित शाळेतील अनुसूचित जमातीतील विद्यार्थी संख्या :

राज्यातील नाशिक, ठाणे,अमरावती व नागपूर या चार ही अपर आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षात एकूण १८६ नामांकित निवासी शाळा असून या शाळांमध्ये अनुसूचित जमातीचे एकूण ५०६८८ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. सदर विद्यार्थीसंख्या अपर आयुक्तालय निहाय पुढील तक्त्यात दिलेली आहे.

**तक्ता क्र. ६**

| अ.क्र. | अपर आयुक्त | शहरातील इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळेत अनुसूचित जमातीतील विद्यार्थीसंख्या (शैक्षणिक वर्ष २०१७-१८अखेर) | | |
|---|---|---|---|---|
| | | मुले | मुली | एकूण |
| १ | नाशिक | १०६८३ | ८००१ | १८६८४ |
| २ | ठाणे | ५२५० | ३३२२ | ८५७२ |
| ३ | अमरावती | ७७७९ | ५५७९ | १३३५८ |
| ४ | नागपूर | ५६६८ | ४४०६ | १००७४ |
| | **एकूण** | **२९३८०** | **२१३०८** | **५०६८८** |

स्त्रोत - आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिक

**आकृती क्र. १**




स्त्रोत - आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिक

उपरोक्त चारही अपर आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या शहरातील नामांकित इंग्रजी माध्यमाच्या निवासी शाळेतील मुले/मुली निहाय विद्यार्थीसंख्येचे अवलोकन केल्यास मुलांच्या तुलनेत मुलींचे इंग्रजी माध्यमाच्या शाळेत शिक्षण घेण्याचे प्रमाण कमी असल्याचे दिसून येते.अनुसूचित जमातीतील मुलींचे इंग्रजी माध्यमाच्या शिक्षणातील प्रमाण वाढविण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

### ३.३ अपर आयुक्तालय निहाय इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळेत अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांचे शेकडा प्रमाण (%) :

**आकृती क्र. २**




स्त्रोत - आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिक

उपरोक्त चारही अपर आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या शहरातील नामांकित इंग्रजी माध्यमाच्या निवासी शाळेतील विद्यार्थीसंख्या विचारात घेतली असता असे आढळून येते की,सर्वात जास्त म्हणजे ३६.८६% नाशिक अपर आयुक्तालयातील कार्यक्षेत्रात असून अनुक्रमे अमरावती २६.३५% व १९.८७% नागपूर अपर आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात शिकत असल्याचे आढळते. तर सर्वात कमी म्हणजे १६.९१% ठाणे अपर आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात प्रवेशित झाले आहेत.तथापि,जनगणना २०११नुसार चारही अपर आयुक्तालयातील अनुसूचित जमातीच्या लोकसंख्येचे अवलोकन केल्यास राज्यात एकूण अनुसूचित जमातीच्या लोकसंख्येत ठाणे अपर आयुक्तालय २ऱ्या क्रमांकावर असून देखील इंग्रजी माध्यमाच्या नामांकित शाळेतील अनुसूचित जमातीची विद्यार्थीसंख्या मात्र कमी आहे. यावरुन असे म्हणता येईल की, या विभागात सदर योजनेबाबत जनजागृती घडवून आणणे आवश्यक आहे.

**३.४ राज्यातील नाशिक अपर आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रामध्ये येणाऱ्या इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळेत प्रकल्पनिहाय अनुसूचित जमातीतील विद्यार्थ्यांची संख्या :**

सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षाअखेर नामांकित शाळेत शिक्षण घेत असलेल्या प्रकल्पनिहाय अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांची संख्या खालील तक्त्यात दिलेली आहे.

**तक्ता क्र. ७**

| अ.क्र | अपर आयुक्त | प्रकल्प कार्यालय | शहरातील इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळेत प्रकल्पनिहाय अनुसूचित जमातीतील विद्यार्थीसंख्या | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | मुले | मुली | एकूण |
| १ | नाशिक | नाशिक | १५०१ | १०६५ | २५६६ |
| २ | | कळवण | १८८९ | १३४५ | ३२३४ |
| ३ | | नंदुरबार | ११८१ | १०५९ | २२४० |
| ४ | | तळोदा | २०७१ | १६८१ | ३७५२ |
| ५ | | धुळे | १३१७ | ११३५ | २४५२ |
| ६ | | यावल | १६२७ | ८८२ | २५०९ |
| ७ | | राजूर | १०९७ | ८३४ | १९३१ |
| | **एकूण** | | **१०६८३** | **८००१** | **१८६८४** |

स्त्रोत - आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिक

**आकृती क्र. ३**




स्त्रोत - आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिक

नाशिक अपर आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात सदर योजनेंतर्गत एकूण ५२ इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळेत सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षाअखेर अनुसूचित जमातीचे एकूण १८६८४ विद्यार्थी प्रवेशित झाले आहेत.यापैकी मुले १०६८३ (५७%) तर मुली ८००१(४३%) शिक्षण घेत आहेत. मुलांच्या तुलनेत प्रवेशित मुलींचे प्रमाण कमी आहे. प्रकल्पनिहाय विद्यार्थीसंख्येचे अवलोकन करता तळोदा प्रकल्पांतर्गत सर्वाधिक २०% तर राजूर प्रकल्पांतर्गत सर्वात कमी १०% विद्यार्थी प्रवेशित झाले आहेत.

### ३.५ राज्यातील ठाणे अपर आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रामध्ये येणाऱ्या इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळेत प्रकल्पनिहाय अनुसूचित जमातीतील विद्यार्थ्यांची संख्या :

**तक्ता क्र. ८**

| अ.क्र | अपर आयुक्त | प्रकल्प कार्यालय | शहरातील इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळेत प्रकल्पनिहाय अनुसूचित जमातीतील विद्यार्थीसंख्या | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | मुले | मुली | एकूण |
| १ | ठाणे | घोडेगाव | ४९१ | ३७८ | ८६९ |
| २ | | शहापूर | ५९५ | ३८४ | ९७९ |
| ३ | | पेण | ६८८ | ४३१ | १११९ |
| ४ | | जव्हार | १४२३ | ९३३ | २३५६ |
| ५ | | डहाणु | १४७९ | ९११ | २३९० |
| ६ | | सोलापूर | ५१६ | २८५ | ८०१ |
| ७ | | मुंबई | ५८ | ० | ५८ |
| **एकूण** | | | **५२५०** | **३३२२** | **८५७२** |

स्रोत - आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिक

**आकृती क्र. ४**




स्रोत - आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिक

ठाणे अपर आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात सदर योजनेंतर्गत एकूण ३६ इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळेत सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षाअखेर अनुसूचित जमातीचे एकूण ८५७२ विद्यार्थी प्रवेशित झाले आहेत.यापैकी मुले ५२५० (६१%) तर मुली ३३२२ (३९%) शिक्षण घेत आहेत.मुलांच्या तुलनेत प्रवेशित मुलींचे प्रमाण फारच कमी आहे.प्रकल्पनिहाय विद्यार्थीसंख्येचे अवलोकन करता डहाणु प्रकल्पांतर्गत सर्वाधिक २८% तर मुंबई प्रकल्पांतर्गत सर्वात कमी १% विद्यार्थी प्रवेशित झाले आहेत.

## ३.६ राज्यातील अमरावती अपर आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रामध्ये येणाऱ्या इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळेत प्रकल्पनिहाय अनुसूचित जमातीतील विद्यार्थ्यांची संख्या :

**तक्ता क्र. ९**

| अ. क्र. | अपर आयुक्त | प्रकल्प कार्यालय | शहरातील इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळेत प्रकल्पनिहाय अनुसूचित जमातीतील विद्यार्थीसंख्या | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | मुले | मुली | एकूण |
| १ | अमरावती | धारणी | १२४० | ७६२ | २००२ |
| २ | | अकोला | ९९९ | ५६७ | १५६६ |
| ३ | | पुसद | ७३५ | ५६० | १२९५ |
| ४ | | पांढरकवडा | ८२५ | ६६९ | १४९४ |
| ५ | | कळमनुरी | १४३९ | ११८२ | २६२१ |
| ६ | | किनवट | १८४२ | १३८९ | ३२३१ |
| ७ | | औरंगाबाद | ६९९ | ४५० | ११४९ |
| **एकूण** | | | **७७७९** | **५५७९** | **१३३५८** |

स्त्रोत - आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिक

**आकृती क्र. ५**




स्त्रोत - आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिक

अमरावती अपर आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात सदर योजनेंतर्गत एकूण ४९ इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळेत  सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षाअखेर अनुसूचित जमातीचे एकूण १३३५८ विद्यार्थी प्रवेशित झाले आहेत.यापैकी मुले ७७७९ (५८%) तर मुली ५५७९(४२%) शिक्षण घेत आहेत.मुलांच्या तुलनेत प्रवेशित मुलींचे प्रमाण कमी आहे.प्रकल्पनिहाय विद्यार्थीसंख्येचे अवलोकन करता किनवट प्रकल्पांतर्गत सर्वाधिक २४% तर औरंगाबाद प्रकल्पांतर्गत सर्वात कमी ९% विद्यार्थी प्रवेशित झाले आहेत.

**३.७ राज्यातील नागपूर अपर आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रामध्ये येणाऱ्या इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळेत प्रकल्पनिहाय अनुसूचित जमातीतील विद्यार्थ्यांची संख्या :**

**तक्ता क्र. १०**

| अ. क्र. | अपर आयुक्त | प्रकल्प कार्यालय | शहरातील इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळेत प्रकल्पनिहाय अनुसूचित जमातीतील विद्यार्थीसंख्या | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | मुले | मुली | एकूण |
| १ | नागपूर | नागपूर | १३५१ | ९९७ | २३४८ |
| २ | | भंडारा | १८२ | १५१ | ३३३ |
| ३ | | देवरी | ११०५ | ९५८ | २०६३ |
| ४ | | चिमूर | ५६० | ४५३ | १०१३ |
| ५ | | चंद्रपूर | ६०७ | ४७९ | १०८६ |
| ६ | | गडचिरोली | ६६४ | ४८१ | ११४५ |
| ७ | | अहेरी | ५२९ | ४३१ | ९६० |
| ८ | | भामरागड | ६७० | ४५६ | ११२६ |
| **एकूण** | | | **५६६८** | **४४०६** | **१००७४** |

स्त्रोत - आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिक

**आकृती क्र. ६**




स्त्रोत - आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिक

नागपूर अपर आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात सदर योजनेंतर्गत एकूण ४९ इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळेत सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षाअखेर अनुसूचित जमातीचे एकूण १००७४ विद्यार्थी प्रवेशित झाले आहेत.यापैकी मुले ५६६८ (५६%) तर मुली ४४०६ (४४%) शिक्षण घेत आहेत.मुलांच्या तुलनेत प्रवेशित मुलींचे प्रमाण कमी आहे.प्रकल्पनिहाय विद्यार्थीसंख्येचे अवलोकन करता नागपूर प्रकल्पांतर्गत सर्वाधिक २३% तर भंडारा प्रकल्पांतर्गत सर्वात कमी ३% विद्यार्थी प्रवेशित झाले आहेत.

## ३.८ इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळेतील एकूण एकंदरीत व अनुसूचित जमातीची विद्यार्थीसंख्या (शैक्षणिक वर्ष २०१७-१८) :

पाहणी करण्यात आलेल्या १५ शहरातील इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळेतील एकूण एकंदरीत व अनुसूचित जमातीची विद्यार्थीसंख्येचे विश्लेषण खालील तक्त्यात देण्यात आले आहे.

**तक्ता क्र. ११**

| अ. क्र. | इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळेचे नाव | एकूण एकंदरीत विद्यार्थीसंख्या | अनुसूचित जमाती विद्यार्थीसंख्या |
|---|---|---|---|
| १ | कर्नाळा स्पोर्टस् ॲकॅडमी बार्न्स हायस्कूल व ज्युनियर कॉलेज पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड. | १७७९ | ६६७ |
| २ | ब्रम्हा व्हॅली पब्लिक स्कुल व ज्युनियर कॉलेज, अंजनेरी, ता.त्र्यंबकेश्वर, जि.नाशिक | २७३६ | १०६३ |
| ३ | एस.एन.डी.इंग्लिश मेडीयम पब्लिक स्कुल, बाभुळगाव, ता.येवला, जि.नाशिक | २४४५ | ११७६ |
| ४ | आत्मा मालिक इंग्लिश मिडीयम स्कुल, अंबई, कंचाड, ता.वाडा., जि.पालघर - | ४७४ | ३६३ |
| ५ | डॉ.डी.एस.आहेर इंग्लिश मेडीयम स्कुल, विठेवाडी, ता.देवळा, जि.नाशिक | ८९७ | ६५४ |
| ६ | स्कॉलर फाउंडेशन हायस्कुल, पाचगणी, ता.महाबळेश्वर, जि.सातारा | ८४२ | ५२७ |
| ७ | ओम गुरूदेव इंग्लिश मिडीयम गुरूकुल, कोकमठाण, ता.कोपरगाव, जि.अहमदनगर. | ४१६३ | २३७३ |
| ८ | पॅरॉडाईज इंग्लिश मिडीयम स्कुल, आरमोरी,जि.गडचिरोली. | ६२८ | १९९ |
| ९ | राजे छत्रपती मार्शल आर्टस इंग्लिश मिडियम स्कूल, पिंपळनेर ता.साक्री, जि.धुळे. | ६८५ | १३० |
| १० | ट्विंकल इंग्लिश मिडियम स्कुल, नागभिड, जि.चंद्रपूर. | ६८१ | ३२७ |
| ११ | सुषमा पाटिल विद्यालय व ज्युनियर कॉलेज कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड. | ३०२६ | ३०५ |
| १२ | सरस्वती इंटरनॅशनल स्कुल, कुर्तडी,ता.कळमनुरी,जि.हिंगोली. | ३०४ | २०० |
| १३ | आत्मा मालिक इंग्लिश मिडीयम स्कुल, CBSE, मोहिली, अघई, ता.शहापुर, जि.ठाणे. | ५५० | २३६ |
| १४ | मातोश्री कमलाताई ठमके इंग्लिश मिडीयम स्कुल, गोकुंदा, ता.किनवट, जि.नांदेड | ११७४ | ५८८ |
| १५ | आदर्श इंग्लिश मेडीयम स्कुल, काकडगाव, नामपुर, ता.बागलाण, जि.नाशिक | ३०५ | ५० |

स्त्रोत – प्राथमिक माहितीच्या आधारे

मुल्यमापन पाहणीतील एकूण १५ नामांकित शाळांपैकी ५ नामांकित शाळेत अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांच्या तुलनेत  सर्वसाधारण विद्यार्थ्यांचे प्रमाण अल्प आहे. अशा परीस्थितीत सर्वसाधारण गटातील विद्यार्थ्यामध्ये एकत्रित राहण्याचे उद्दिष्टे कितपत साध्य होईल याबाबत प्रश्नच निर्माण होतो.यामुळे सर्वसाधारणत: इंग्रजी माध्यमाच्या नामांकित शाळेत प्रकल्पातील विद्यार्थी देताना सर्वसाधारण गटातील विद्यार्थी व अनुसूचित जमातीचे विद्यार्थी याचे प्रमाण समान राहील या बाबीकडे विशेष लक्ष देण्यात यावे.

# प्रकरण -४

## शैक्षणिक सोयीसुविधा

इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळेची योजना सुरू करण्यामागील मुख्य उद्देश आदिवासी विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमातून सर्वसाधारण मुलांसोबत उत्कृष्ट शिक्षण मिळावे हा आहे. याद्वारे त्यांच्यातील शैक्षणिक गुणवत्तेत सुधार व्हावा अशी संकल्पना आहे. याद्दष्टीकोनातून पाहणीतील नामांकित शाळांमध्ये खालील प्रकारची परिस्थिती आढळुन आली. पाहणी करण्यात आलेल्या १५ नामांकित शाळांपैकी १३नामांकित शाळांच्या इमारती स्वत:च्या मालकीच्या असून केवळ राजे छत्रपती मार्शल आर्टस् इंग्लिश मिडियम स्कूल, पिंपळनेर ता. साक्री, जि.धुळे व स्कॉलर फाउंडेशन हायस्कुल ,पाचगणी, ता.महाबळेश्वर, जि.सातारा या दोन नामांकित शाळांची इमारत भाडयाची असल्याचे आढळून आले .

**४.१) वर्गखोल्या :**



**डॉ.डी.एस.आहेर पब्लिक स्कूल विठेवाडी,ता.देवळा,जि.नाशिक**

नामांकित शाळांमधील वर्गखोल्या स्वतंत्र व सुसज्ज स्वरूपाच्या होत्या. तसेच विद्यार्थ्यांना एकत्रच बसण्याची पुरेशी व्यवस्था असल्याचे आढळले. ज्या नामांकित शाळेत विद्यार्थीसंख्या जास्त होती अशा ठिकाणी अतिरीक्त तुकडीकरीता स्वतंत्र वर्गखोली आढळून आली तसेच प्रत्येक वर्गखोलीमध्ये विद्यार्थीपट संख्येनुसार पुरेसे बेंचेस असून वर्गखोल्यातील वातावरण शिकण्यासाठी पोषक स्वरुपाचे होते.तसेच वर्गातील भिंतीवर उदबोधक स्वरुपाचे शिक्षणास सहाय़्यक ठरेल असे चित्रफलक लावण्यात आलेले होते.एकाच डेक्सबेंचेसवर सर्वसाधारण व आदिवासी विद्यार्थी बसून शिक्षण घेत असल्यामूळे आदिवासी विद्यार्थ्यास संबंधित विषय चांगल्या पध्दतीने समजण्यास सहाय्य होत असावे.

**४.२) ग्रंथालय :**



ट्विंकल इंग्लिश मिडियम स्कुल,नागभिड,जि.चंद्रपूर

नामांकित निवासी शाळांत पाहणी दरम्यान आढळून आलेली एक लक्षणीय बाब म्हणजे वाचनसंस्कृती बळकट करण्यासाठी केले जाणारे प्रयत्न.पाहणी केलेल्या बहुतेक नामांकित शाळामधील वाचनालये चांगल्यापैकी सुसज्ज असून विद्यार्थ्यांना त्यांच्या वयानुरूप अवांतर वाचनासाठी पुस्तके वाटप केले जात असल्याचे व विद्यार्थी देखील स्वयं स्फुर्तीने त्यांच्या आवडीची पुस्तके वाचत असल्याचे उपलब्ध असलेल्या नोंदवहीवरुन आढळून आले तसेच वाचनालयात दररोजची इंग्रजी व हिंदी भाषेतील वर्तमानपत्रांचा समावेश असल्याचे आढळून आले. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाच्या या आवडीस असेच प्रोत्साहन मिळाल्यास त्यांच्यात सामान्यज्ञानाची पातळी निश्चितपणे उंचावेल. पाहणीतील काही नामांकित शाळात वाचनालयासोबतच उत्तम हवेशीर चांगली प्रकाशव्यवस्था असणारे व बसण्याची उत्तम सुविधा असणारे वाचनकक्ष आहे. अशा उत्कृष्ट स्वरुपाच्या वाचनकक्षेमुळे मुलांमध्ये वाचनाची आवड निर्माण होत असावी.

**४.३) संगणक कक्ष :**



**आत्मा मालिक इंग्लिश मिडीयम स्कुल ,CBSE, मोहिली, अघई, ता.शहापुर, जि.ठाणे**

पाहणीतील बहुतांश नामांकित शाळांमध्ये सुसज्ज संगणक कक्ष असल्याचे आढळून आले या कक्षात नविनतम कार्यक्षम इंटरनेटसह संगणक बसवल्याचे पहावयास मिळाले तसेच प्रशिक्षित संगणक तज्ञ देखील नेमण्यात आले आहेत. शालेय तासिकेतच संगणक शिकण्याचा तास अंतर्भूत असल्यामुळे संगणक कक्षाचा प्रत्यक्षात वापर होत असून पाहणीतील बहुतांश नामांकित शाळांमध्ये आदिवासी विद्यार्थी प्राथमिक स्तरावर शिक्षण घेत असल्यामुळे त्यांचा संगणकाचा वापर मर्यादित स्वरुपाचा होता. मात्र या संगणक कक्षामध्ये प्रत्येक इयत्तेतील विद्यार्थ्यांना वेळापत्रकानुसार ठराविक तास शिकावे लागत असल्याने सर्वच विद्यार्थी संगणकाशी परिचित असल्याचे आढळले .

**४.४) डिजीटल कक्ष :**

इंग्रजी विषयासह इतर अभ्यासविषयात देखील विद्यार्थ्यांमध्ये आवड निर्माण होवून त्यांच्या ज्ञानात भर पडण्यासाठी पाहणीतील सर्वच नामांकित शाळांमध्ये ई-लर्निंगद्वारे शिक्षण दिले जाते. या नामांकित शाळांमध्ये ई-लर्निंगची देखील उत्कृष्ट व्यवस्था असून पाहणींतर्गत सर्वच नामांकित शाळेत स्वतंत्र डिजीटल कक्ष आढळून आले.या कक्षात बसविण्यात आलेली यंत्रणा हि सुसज्ज व कार्यरत असल्याचे आढळून आले.



**स्कॉलर फाउंडेशन हायस्कुल, पाचगणी, ता.महाबळेश्वर, जि.सातारा.**

**४.५) प्रयोगशाळा :**



**एस.एन.डी.इंग्लिश मिडियम पब्लिक स्कूल, बाभुळगाव, ता.येवला, जि.नाशिक.**

पाहणी केलेल्या नामांकित शाळांमध्ये भौतिकशास्त्र, जीवशास्त्र, रसायनशास्त्र यांच्या प्रयोगशाळा आहेत. निकषानुसार या प्रयोगशाळेत प्रयोगशाळा सहाय्यक असणे अनिवार्य आहे मात्र पाहणी करण्यात आलेल्या बहुतांश नामांकित शाळांमध्ये प्रयोगशाळा सहाय्यकाऐवजी त्या-त्या विषयाचे शिक्षक प्रयोगशाळेची जबाबदारी सांभाळताना आढळून आले. प्रयोगशाळेची योग्य पध्दतीने देखभाल होण्यासाठी व विद्यार्थ्यांच्या सूरक्षेसंबंधित प्रयोगशाळा सहाय्यक असणे आवश्यक आहे.

## ४.६) क्रिडांगण :

नामांकित शाळांमध्ये पाहणी दरम्यान एक बाब प्रकर्षाने आढळून आली ती म्हणजे आदिवासी विद्यार्थ्यांचे मैदानी खेळातील उत्कृष्ट प्रदर्शन नामांकित शाळांमध्ये मैदानाची व्यवस्था चांगल्या दर्जाची होती तसेच नामांकीत शाळेत स्वतंत्र क्रिडा कक्ष असून क्रिडा प्रशिक्षणासाठी पूर्णवेळ क्रिडा प्रशिक्षक नेमण्यात आले आहेत.या शाळांमध्ये नियमितपणे खेळांच्या स्पर्धा तर होतातच व याशिवाय खेळा चा नियमित सराव देखील करून घेण्यात येतो.विशेष म्हणजे खो-खो,कबड्डी,ॲथलॅटिक खेळांच्या स्पर्धेत आदिवासी विद्यार्थी उत्कृष्ट कामगिरी करत असल्याचे आढळून आले. शाळेतुन प्राप्त माहितीनुसार या विद्यार्थ्यांनी ज्या ज्या स्पर्धामध्ये भाग घेतला तेथे त्यांनी पारितोषिक प्राप्त केले आहे. राजे छत्रपती मार्शल आर्टस् इंग्लिश मिडियमस्कूल,पिंपळनेर ता.साक्री जि.धुळे.याशाळेतील सदर योजनेंतर्गत प्रवेशित एका विद्यार्थीनीने सन २०१६-१७ यावर्षी कराटे या क्रिडाप्रकारात राज्यस्तरीय पातळीवर सिल्व्हर मेडल प्राप्त केले असून सन २०१७-१८यावर्षी सिकई मिशल आट्र्स या क्रिडा प्रकारात योजनेंतर्गत प्रवेशित एका विद्यार्थ्याने राज्यस्तरीय पातळीवर ब्रॉझ मेडल प्राप्त केले आहे. पाहणीतील बहुतेक नामांकित शाळेत या योजनेंतर्गत शिक्षण घेत असणारे विद्यार्थी हे ५ वी पर्यंतच्याच इयत्तेत शिकत आहेत या लहान वयातील मुलांना आकर्षक व सुसज्ज अशा मैदानी खेळांच्या सुविधा याठिकाणी आढळून आल्या तसेच कॅरम,बुध्दिबळ असे बैठे खेळ खेळण्याच्या व्यवस्थेसह इतर खेळाडूंना खेळताना बघण्यासाठी देखील बसण्याची उत्तम व्यवस्था असल्याचे आढळून आले.एकूणच नामांकित शाळांमध्ये क्रिडाविषयक सर्वच सुविधा विद्यार्थ्यांना उत्तम प्रोत्साहन देणाऱ्या असल्याचे आढळून आले.



**सरस्वती इंटरनॅशनल स्कुल, कुर्तडी,ता.कळमनुरी जि.हिंगोली**

### ४.७) शैक्षणिक साहित्य :

या योजनेंतर्गत नामांकित शाळेत प्रवेशित होणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यास दरवर्षी खालीलप्रमाणे शैक्षणिक साहित्य पुरविण्यात येते.

**तक्ता क्र. १२**

| अ.क्र. | शालेय साहित्य व लेखन सामग्री | |
|---|---|---|
| १ | स्कुल बॅग | वर्षासाठी १ नग |
| २ | शालेय पुस्तके | |
| ३ | वह्या | |
| ४ | कंपास | |
| ५ | स्केच पेन | |
| ६ | एचबी पेन्सिल | |
| ७ | खोड रबर | |
| ८ | शार्पनर | |
| ९ | प्लास्टिक फूट पट्टी | |
| १० | लिहण्याचा पॅड | |
| ११ | बॉलपेन | |
| १२ | बॉलपेन रिफिल | आवश्यकतेनुसार |

स्त्रोत – प्राथमिक माहितीच्या आधारे

नामांकित शाळेत दाखल करण्यात आलेल्या आदिवासी विद्यार्थ्यांना पुरविण्यात आलेले शैक्षणिक साहित्य उत्तम दर्जाचे असल्याचे आढळून आले. या विद्यार्थ्यांसोबत याबाबतीत विचारणा केली असता त्या सर्वांना या व्यवस्थेचे कौतुक असल्याचे दिसून आले .

### ४.८) सांस्कृतिक सभागृह :



**शैक्ष**

**मातोश्री कमलाताई ठमके इंग्लिश मिडीयम स्कुल, गोकुंदा, ता.किनवट, जि.नांदेड**

आदिवासी विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रमांच्या योजनासाठी पाहणीतील बहुतांश नामांकित शाळेत सांस्कृतिक सभागृह असुन या सभागृहात जयंती, पुण्यतिथी, वार्षिक स्नेहसंमेलन, पालक मेळावा, प्रबोधनपर व्याख्यान यासारखे कार्यक्रम घेतले जातात.

पाहणी केलेल्या बहुतेक सर्व शाळांमध्ये शिक्षक अर्हताप्राप्त होते. मात्र सर्वच शिक्षकांचे शिक्षण इंग्रजी माध्यमातूनच झाले असावे असे सांगता येत नाही तसेच सर्व नामांकित शाळा खाजगी संस्थाकडून संचलित असल्यामूळे नेमलेले शिक्षक दीर्घकालावधीसाठी नेमण्यात आले असतील याबाबत त्यांच्याशी झालेल्या अनौपचारिक चर्चेतुन खात्री देण्यात येवू शकत नाही.त्यामुळे बऱ्याच नामांकित शाळेत शिक्षक अल्प पगारावर व कमी कालावधीसाठी असावेत अशी शंका आहे.परिणामी यातून शिक्षणाची गुणवत्ता कशी साधली जाईल हा प्रश्नच आहे.

पाहणीतील बहुतेक सर्व नामांकित शाळांत इयत्ता १ ली व इयत्ता २ री मधील विद्यार्थ्यांमध्ये मोठयाप्रमाणात बुजरेपणा आढळून आला.या विद्यार्थ्याची मातृभाषा हि आदिवासी बोलीभाषा असल्याने त्यांना मराठी किंवा हिंदी समजणे अवघड जात असल्याचे आढळून आले.मुळातच बुजरेपणाच्या दडपणाखाली असल्यामुळे न समजलेली बाब शिक्षकांना विचारता येत नव्हती त्यातच शिक्षक बहुतेक ठिकाणी हिंदीचा वापर करीत होते.इतर सर्वसाधारण विद्यार्थी व शिक्षक यांचेसाठी संभाषणाची ही व्यवस्था योग्य असली तरी योजनेंतर्गत आदिवासी भागातून आलेल्या या लहान मुलांना हि व्यवस्था निश्चितपणे अडचणीची होती.वरच्या इयत्तेतील हे विद्यार्थी मात्र इंग्रजी माध्यमाच्या या नविन वातावरणाशी रुळलेले आढळून आले.या विद्यार्थ्यांसोबत पाहणीच्या वेळी अनौपचारीक चर्चा केली असता त्यांच्यात वेगवेगळ्या विषयांची समज चांगल्या प्रकारे असल्याचे आढळून आले.शासकिय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या तुलनेत या नामांकित शाळेतील विद्यार्थ्यांची आकलन क्षमता व बौध्दिक क्षमता उत्कृष्ट असल्याचे आढळून आले. योजनेंतर्गत इंग्रजी माध्यमाच्या निवासी नामांकित शाळेत आदिवासी विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याचा मुख्य उद्देश या विद्यार्थ्यांच्या इंग्रजी भाषेच्या ज्ञानात सुधारणा व्हावी व याद्वारे इंग्रजी भाषेत उपलब्ध असणाऱ्या विस्तृत ज्ञानाच्या विश्वाची ओळख त्यांना व्हावी हा आहे.या अनुषंगाने विद्यार्थ्यांमध्ये या दृष्टीकोनातून अपेक्षित सकारात्मक बदल निश्चितपणे झालेला आहे.

**४.९) शैक्षणिक प्रगती :**

नामांकित शाळेत प्रवेशित झालेले अनुसूचित जमातीचे बरेचसे विद्यार्थी मराठी माध्यमातून प्रवेशित झाले असल्याकारणाने त्यांच्यांत इंग्रजी माध्यमाचे पायाभूत ज्ञान कमी असते यामुळे सदर विद्यार्थ्यांची पायाभुत तयारी करुन घेणे व त्यानंतर नियमित अभ्यासक्रम शिकविणे आवश्यक असते, सदर विद्यार्थ्यांना पेन्सिल,पेन कसा धरायचा यापासून ते इंग्रजी माध्यमासाठी आवश्यक असणाऱ्या पायाभूत सर्व बाबी शिकविण्यासाठी अधिकचे प्रयत्न नामांकित शाळेकडून केले जातात.अनुसूचित जमातीतील विद्यार्थ्याच्या इंग्रजी भाषेच्या सखोल तयारीसाठी शिक्षकांना जादा वर्गाचे नियोजन करुन सलग दिड ते दोन वर्ष या विद्यार्थ्यांवर अधिकच प्रयत्न केल्यानंतर हे विद्यार्थी इतर विद्यार्थ्यांसमवेत मुख्य प्रवाहात येतात.शाळेकडून केल्या जाणाऱ्या विशेष प्रयत्नांमुळे या विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक विशेष बदल व अभ्यासाविषयी ची गोडी निर्माण होवून त्यांचा बौध्दिक व शैक्षणिक प्रगतीचा स्तर उंचावत असल्याचे दिसून आले.

# प्रकरण — ५

## अशैक्षणिक सोयीसुविधा

सदर योजनेंतर्गत एकुण १५ नामांकित शाळांची पाहणी करण्यात आली. पाहणींतर्गत सदर योजनेचा उद्देश योग्य रितीने अंमलात आणून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेत सुधार होतो आहे किंवा नाही हे तपासण्यात आले. त्याचसोबत विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या सोयीसुविधांची देखील पाहणी करण्यात आली. निवास संदर्भातील आढळलेली बाबनिहाय वस्तुस्थिती खालीलप्रमाणे.

**५.१) निवासव्यवस्था :**

सदर योजनेत इंग्रजी माध्यमाच्या शाळेला सहभागी होण्यासाठी ती शाळा निवासी स्वरुपाची असणे हि प्राथमिक अट आहे. वसतिगृहांच्या संदर्भात पाहणी केलेल्या बहुतांश नामांकित शाळांमध्ये संस्थेच्या मालकीच्या इमारतीत वसतिगृहाची व्यवस्था करण्यात आल्याचे आढळून आले.केवळ पाहणीतील ४ नामांकित शाळांमध्ये वसतिगृहाची व्यवस्था भाडयाच्या इमारतीत होती तर काही शाळांनी विद्यार्थ्यांच्या निवासाची व्यवस्था शाळेच्या इमारतीतच काही बदल करुन केलेली होती.यासंदर्भात संबंधित यंत्रणेतील काही अधिकाऱ्यांसोबत चर्चा केली असता त्याचेकडून असे ही सांगण्यात आले कि,काही नामांकित शाळांमध्ये त्यांची स्वत:ची अशी स्वतंत्र निवासव्यवस्था नसून त्यांनी निवासव्यवस्था पुरविणाऱ्या संस्थेची सेवा भागीदारी तत्वावर घेतलेली आहे. पॅरॉडाईज इंग्लिश मिडीयम स्कुल, आरमोरी,जि.गडचिरोली नामांकित शाळेचे वसतिगृह भाडेतत्वावर असून ते शाळेपासून २ ते ३ कि. मी .अंतरावर आहे. स्कॉलर फाउंडेशन हायस्कुल ,पाचगणी, ता.महाबळेश्वर, जि.सातारा यानामांकित शाळेने शालेय परीसरात असणाऱ्या वसतिगृहातील जागेच्या कमतरतेमुळे काही विद्यार्थ्यांसाठी निवासाची व्यवस्था शाळेपासुन ४ ते ५ कि.मी. अंतरावर भाडेतत्वावर जागा घेवुन केली आहे. शाळेपासून दूर अंतरावर असणाऱ्या वसतिगृहातील विद्यार्थ्यांची ने-आण स्कुल बसने करण्यात येते.तसेच राजे छत्रपती मार्शल आर्टस इंग्लिश स्कूल,पिंपळनेर,ता.साक्री, जि.धुळे. व सुषमा पाटील विद्यालय व ज्युनिअर कॉलेज,कामोठे,ता.पनवेल जि.रायगड.या नामांकित शाळांचे वसतिगृह भाडेतत्वावर असले तरी शाळेजवळच आहे. पाहणीतील एकुण



**आत्मा मालिक इंग्लिश मेडीयम स्कुल, CBSE, मोहिली, अघई, ता.शहापुर, जि.ठाणे.**

नामांकित १५ शाळांपैकी १३ नामांकित शाळेत प्रत्येक विद्यार्थ्याला झोपण्यासाठी कॉटची व्यवस्था करण्यात आली असून उर्वरीत २ नामांकित शाळेत कॉटची व्यवस्था नसल्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याला स्वतंत्र गादी देण्यात आली आहे. पाहणीतील काही वसतिगृहात विद्यार्थ्यांना त्यांचे वैयक्तिक सामान ठेवण्यासाठी कॉटच्या खालच्या बाजूस ड्रॉवर सारखी प्रशस्त व्यवस्था करण्यात आली होती तर काही ठिकाणी प्रत्येक विद्यार्थ्यास स्वतंत्र असे छोटया स्वरुपाचे कपाट देण्यात आले असून त्यास कुलूप लावण्याची सोय करण्यात आली आहे.या सुविधेमुळे वसतिगृहात विद्यार्थ्यांच्या सामानासंबंधी कोठेही अस्ताव्यस्तपणा आढळून आला नाही. वसतिगृहात या योजनेतील आदिवासी मुले व इतर सर्वसाधारण मुले एकत्रच राहत होती.



**ओम गुरूदेव इंग्लिश मिडीयम गुरूकुल, कोकमठाण, ता.कोपरगाव, जि.अहमदनगर.**

तसेच या वसतिगृहात स्वच्छतागृहे, स्नानगृहे यांची पुरेशी व्यवस्था तर होतीच याशिवाय तेथील स्वच्छता देखील योग्य प्रकारची होती. पाहणीतील सर्वच नामांकित शाळेमध्ये वसतिगृहात वापरासाठी पुरेशा प्रमाणात पाणीपुरवठ्याची व्यवस्था असल्याचे आढळून आले. तसेच विद्यार्थ्यांच्या आंघोळीसाठी गरम पाण्याची व्यवस्था करण्यात आली असून यासाठी सोलर सिस्टीम बसविण्यात आली आहे.

विद्यार्थ्यांच्या निवासाच्या जागेबाबत शासनाने प्रत्येक विद्यार्थ्यासाठी किमान २४ चौ.फुट जागेचे मानक निश्चित केले आहे.या अपेक्षेप्रमाणे बहुतेक सर्व वसतिगृहात (भाडेतत्वावरील वसतिगृह वगळून) जागा असल्याचे सकृत दर्शनी दिसून आले.याशिवाय निवासाची जागा हवेशीर व भरपूर नैसर्गिक प्रकाशाची व्यवस्था अशा स्वरुपाची सोयीने परीपुर्ण तसेच स्वच्छतेचे निकष पुर्ण करणारी असल्याचे आढळून आले. ज्या नामांकित शाळांनी निवासस्थानासाठी जागा भाडयाने घेतल्या आहेत तेथील व्यवस्था जेमतेम स्वरुपाचीच होती बऱ्याच सोयी मानकानुसार नसल्याचे निदर्शनास आले.विद्यार्थ्यांच्या निवासाच्या संदर्भात उपरोक्त प्रमाणे विविध स्वरुपाचे विकल्प असले तरी सर्वसाधारणपणे निवासव्यवस्थेची गुणवत्ता चांगल्या स्थितीत असल्याचे दिसून आले.

**५.२) वसतिगृह अधिक्षक :**

पाहणीतील सर्व नामांकित शाळांच्या वसतिगृहामध्ये मुलांच्या वसतिगृहासाठी पुरुष अधिक्षक व मुलींच्या वसतिगृहासाठी स्त्री अधिक्षिका व त्यांचे निवासस्थान वसतिगृहाच्या परिसरातच आढळून आले. या अधिक्षकांच्या मदतीसाठी व वसतिगृहात विद्यार्थ्यांची संपूर्ण काळजी घेण्यासाठी स्त्री किंवा पुरुष "मदतनिस"त्याठिकाणी नेमण्यात येतात. हे "मदतनिस" विशेषत: लहान मुलांना वेळेत जागे करणे, त्यांच्या नित्यकर्मात मदत करणे, त्यांना शाळेत जाण्यासाठी तयार करणे, इ.कामे पार पाडतात तसेच हे विद्यार्थी शाळेत गेल्यावर वसतिगृहाची संपूर्ण स्वच्छता जसे कि त्यांचे बिछाने निटनिटके करणे लहान वर्गातील विद्यार्थी शाळेतुन परतल्यावर त्यांचे गणवेश बदलणे, त्यांचे हातपाय धुणे, त्यांना संध्याकाळच्या अल्पोपहारासाठी भोजनकक्षात नेणे, झोपण्याआधी नाईटड्रेस परिधान करण्यास सहाय्य करणे, रात्री विदयार्थ्यांच्या निवास कक्षातच झोपणे, इत्यादी कामे करतात. विशेषत: हे मदतनिस वसतिगृहाच्या प्रत्येक खोलीत २४ तास राहत असल्याचे आढळून आले. लहान मुलांची काळजी घेण्याच्या दृष्टीकोनातून नामांकित शाळेत आढळून आलेली ही बाब निश्चितपणे उत्तम स्वरूपाची आहे.

पाहणीतील नामांकित शाळांमध्ये वसतिगृहासंदर्भात आढळून आलेली वस्तुस्थिती अशी आहे कि, नामांकित शाळेच्या वसतिगृहात राहण्याचा या विद्यार्थ्यांच्या दैनंदिन जीवनावर चांगला परिणाम झाल्याचे ही आढळून आले. वैयक्तिक स्वच्छता पाळणे,स्वच्छ कपडे निटनिटकेपणे परीधान करणे,स्वयंशिस्त पाळणे तसेच जेवताना चांगल्या पध्दतीचा अवलंब करणे,जेवणापुर्वी व जेवणानंतर हात स्वच्छ धुणे इ.बाबीच्या सवयी मुलांनी आत्मसात केल्याचे आढळून आले,याशिवाय शाळेत जाताना शाळेच्या वेळापत्रकाप्रमाणे स्वत:चे दप्तर व्यवस्थित तयार करुन ते शाळेत दिलेला गृहपाठ त्यासाठी अभ्यासासाठी राखुन ठेवलेल्या वेळेत स्वयंप्रेरणेने पुर्ण करणे याबाबी त्यांच्या अंगी रुजल्याचे आढळून आले .

**५.३) अभ्यासकक्ष :**

पाहणीतील बहुतांश नामांकित शाळेमध्ये वसतिगृहाच्या आवारात स्वतंत्र असा अभ्यासकक्ष असून या कक्षात रात्रीच्या जेवणानंतर सर्वसाधारणपणे रात्री १० वाजेपर्यंत विद्यार्थ्यांना शाळेत दिलेला अभ्यास पुर्ण करावयाचा असतो.तसेच यावेळी या अभ्यासकक्षात शिक्षक नव्याने दाखल झालेल्या आदिवासी विद्यार्थ्यांचा इंग्रजी भाषेचा स्वतंत्र वर्ग घेत असल्याचे आढळून आले.

## ५.४) वैयक्तिक वापराच्या साहित्याचा पुरवठा :

या योजनेंतर्गत नामांकित शाळेत प्रवेशित होणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यास दरवर्षी खालीलप्रमाणे वैयक्तिक वापराचे साहित्य पुरविण्यात येते.

**तक्ता क्र. १३**

| अ.क्र. | वस्तुचे नाव | खरेदी करावयाचे नग |
|---|---|---|
| | **स्वच्छता प्रसाधने :-** | |
| १ | आंघोळीचा साबण (किमान १०० ग्रॅम) | १ (प्रती माह प्रमाणे) |
| २ | कपडे धुण्याचा साबण(किमान १०० ग्रॅम) | ४ (प्रती माह प्रमाणे) |
| ३ | खोबरेल तेल (१०० मिली) | १ (प्रती माह प्रमाणे) |
| ४ | टुथपेस्ट (किमान ५० ग्रॅम) | १ (प्रती माह प्रमाणे) |
| ५ | टुथब्रश | ४ (वार्षिक) |
| ६ | कंगवा | २ (वार्षिक) |
| ७ | नेलकटर | २ (वार्षिक) |
| ८ | मुलींसाठी रिबन (जोड) | ४ (वार्षिक) |
| ९ | मुलींसाठी सॅनिटरी नॅपकीन (१० पॅड प्रति पॅक) (आवश्यकता असल्यास) | प्रती महा १ पॅक |
| | **ब) वैयक्तिक साहित्य:—** | |
| १ | शालेय गणवेश | २ संच |
| २ | पी.टी.ड्रेस | १ संच |
| ३ | नाईट ड्रेस | २ संच |
| ४ | अंडर गारमेंट | २ संच |
| ५ | वुलन स्वेटर | १ संच |
| ६ | टॉवेल | २ संच |
| ७ | चप्पल | २ जोड |
| ८ | स्कूल शूज | २ जोड |
| ९ | स्पोर्ट शुज | १ जोड |
| १० | सॉक्स | २ जोड |

स्त्रोत — आदिवासी विकास विभाग आयुक्तालय, नाशिक

पाहणी केलेल्या सर्वच नामांकित शाळांमध्ये हे साहित्य पुरविण्यात येते. या संदर्भातील परिस्थिती अशी आहे कि, शाळा सुरू होण्याच्या वेळेस हे सर्व साहित्य मुलांना देण्यात येते. त्याची प्रत देखील चांगल्या स्वरूपाची असते. या साहित्याचा योग्य वापर करण्याची पध्दत देखील मुलांना शिकविण्यात येते. पुरविण्यात येणाऱ्या या साहित्याबाबत विद्यार्थ्यांसोबत चर्चा केली असता याबाबत ते समाधानी असल्याचे त्यांनी सांगितले.

**५.५) वैद्यकिय सोयीसुविधा :**

विद्यार्थ्यांच्या आरोग्याबाबत बहुतेक नामांकित शाळांमध्ये उत्कृष्ट काळजी घेत असल्याचे दिसून आले. पाहणीतील सर्वच नामांकित शाळांमध्ये आजारी विद्यार्थ्यांना औषधोपचार व आराम करणेसाठी स्वतंत्र खोली म्हणजे सिकरुम असल्याचे आढळून आले. या सिकरुममध्येच प्रथमोपचार साहित्य देखील ठेवण्यात आले होते आजारी विद्यार्थ्यांचा औषधोपचार करणेसाठी १ नर्स २४ तास उपलब्ध असल्याचे आढळून आले.तसेच आत्मा मालिक इंग्लिश मिडीयम स्कुल, मोहिली, अघई, ता.शहापुर, जि.ठाणे. येथील नामांकित शाळेत छोटेखानी 'दवाखाना' उभारल्याचे दिसून आले. यात १ डॉक्टर व १ नर्स नेमल्याचे आढळले तसेच डॉक्टरांच्या अनुपस्थितीत नर्स २४ तास उपलब्ध असल्याचे सांगण्यात आले हे तेथील नोंदीवरून देखील स्पष्ट होत होते.त्यामुळे मुलांच्या आरोग्याची काळजी सातत्याने घेतली जात असावी असे वाटते.एकुणच नामांकित शाळांतील वातावरण निश्चितपणे उत्कृष्ट असल्याचे आढळून आले. सदर सर्व परिस्थीती शासनाने विहीत केल्याप्रमाणे या योजनेतील नामांकित शाळांमध्ये व्यवस्था जशी असणे अपेक्षित आहे तशी असल्याचे आढळून आले.




**कर्नाळा स्पोर्टस् ॲकॅडमी बार्न्स हायस्कूल व ज्युनियर कॉलेज, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड.**

**५.६) भोजनव्यवस्था :**

नामांकित शाळात आढळलेली अजून एक लक्षणीय बाब म्हणजे येथील सुसज्ज स्वयंपाकगृह व कोठीगृह. स्वयंपाकगृह व कोठीगृह यांची पाहणी केली असता येथील सोयी सर्वसाधारणत: स्वच्छ व योग्य सुविधायुक्त होत्या.विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या अन्नपदार्थाचा दर्जा चांगला असल्याचे तसेच विद्यार्थ्यांना पुरेशा प्रमाणात अन्नपुरवठा होत असल्याचे आढळून आले.



**डॉ.डी.एस.आहेर पब्लिक स्कूल विठेवाडी, ता.देवळा, जि.नाशिक**

पाहणीतील १५ नामांकित शाळांपैकी १० नामांकित शाळेत वसतिगृहातील भोजनकक्षात विद्यार्थ्यांना भोजनासाठी डायनिंग टेबल ची व्यवस्था करण्यात आली असून उर्वरित ५ नामांकित शाळेत डायनिंग टेबल नसून आसनपट्टीवर बसून विद्यार्थी भोजन करतात.तसेच विद्यार्थ्यांना हात धुण्यासाठी पुरेशा प्रमाणात मेसमध्ये वॉश बेसिन उपलब्ध असल्याचे आढळून आले.स्वयंपाकगृह व कोठीगृह यासह त्यांच्या जेवणाची जागा या ठिकाणी देखील उत्तम स्वच्छता असल्याचे आढळून आले. या स्वच्छतेमुळे आदिवासी मुलांना स्वाभाविकपणे स्वच्छ राहण्याचा धडा आपोआपच मिळतो मिळणारे अन्न उत्तम वातावरणात ग्रहण करता येत असल्याने त्यांची त्याविषयीची आत्मियता वाढते व मुलांचा दिवस उत्साहात जात असल्याचे आढळून आले.हि बाब अधिक प्रकर्षाने उल्लेखनीय आहे.



**मातोश्री कमलाताई ठमके इंग्लिश मिडीयम स्कुल, गोकुंदा, ता.किनवट, जि.नांदेड**

**पाहणीतील बहुतेक सर्व नामांकित शाळांमध्ये वसतीगृहाची स्वतंत्र इमारत असून त्यात बहूसंख्य आदिवासी विद्यार्थी आहेत. हे आदिवासी विद्यार्थी या योजनेतून शाळेत दाखल झालेले आहेत सर्वसामान्य विद्यार्थी वसतिगृहात फारशे आढळून आले नाहीत. परिणामी शाळेच्या वेळेव्यतिरीक्त सर्वसामान्य मुलांसोबतच्या सहजीवनातून आदिवासी विद्यार्थ्यांवर जे संस्कार होणे अपेक्षित आहे तो उद्देश अशा शाळेत सफल होण्यास मर्यादा येतात असे म्हणणे वावगे ठरणार नाही.**

# प्रकरण — ६

## शालेय उपक्रम

**अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांच्या इंग्रजी विषयाच्या ज्ञानात वाढ होण्याकरीता सर्वांगीण प्रगती व व्यक्तीमत्व विकासासाठी शालेय पातळीवर राबविण्यात येणारे उपक्रम :**

इंग्रजी विषयाच्या ज्ञानात वाढ होण्याकरीता उच्च शिक्षणासाठी इंग्रजी भाषेचे उत्तम ज्ञान असणे हि प्राथमिक गरज आहे.या उद्देशानेच आदिवासी विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमातून शिक्षणाची संधी प्राप्त होण्यासाठी हि योजना सुरु झाली आहे.इंग्रजी माध्यमातील शालेय प्रवेशाच्यावेळी आदिवासी विद्यार्थी हे वर्गातील सर्वसाधारण विद्यार्थ्यांच्या तुलनेत इंग्रजी विषयाच्या ज्ञानाबाबत पुर्णत: अनभिज्ञ असतात .अनुसूचित जमातीचे बहुतांश विद्यार्थी वाडी-वस्ती व खेडयातुन आलेले असतात .त्यांच्या घरातील वातावरण देखील शिक्षणास फारसे प्रोत्साहित करणारे नसल्याने इंग्रजी भाषेची ओळख या विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश घेतल्यावरच होते. घरातील बोलीभाषा त्या त्या जमातीची स्वतंत्र वेगळी असते अनेकदा मराठीचे ज्ञान देखील तसे जुजबीच .अशा परीस्थितीतून आलेल्या या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमातून देण्यात येणाऱ्या शिक्षणाचे आकलन योग्य प्रकारे होण्यासाठी तसेच या विद्यार्थ्यांच्या मनात इंग्रजी भाषेविषयी असलेला न्युनगंड कमी करुन या भाषेविषयी ज्ञान वाढविण्यासाठी तसेच व्यक्तिमत्व विकास घडवून आणणेसाठी शालेय पातळीवर काही विशेष प्रयत्न केले जातात असे निदर्शनास आले.

### ६.१) इंग्रजी शिकवणी वर्ग :

इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळेत आदिवासी विद्यार्थी प्रवेशित होतो त्यावेळी इंग्रजी भाषेविषयी अनभिज्ञ असल्याने इंग्रजी माध्यमाचा पाया कच्चा असतो.यामुळे वर्गातील इतर विद्यार्थ्यांच्या गतीनेच अभ्यासाच्या आकलनाची गती असावी यासाठी शालेय वेळेव्यतिरीक्त संध्याकाळी या विद्यार्थ्यांचे इंग्रजी विषयाची जादा शिकवणी घेतली जाते.या शिकवणी वर्गात इंग्रजी शब्दाची अक्षर ओळख व इंग्रजी शब्दांचा उच्चार करुन घेणे यासारख्या प्राथमिक बाबींचा सराव घेतला जातो.इंग्रजी भाषेच्या शाळेत रुळण्यासाठी हा प्रयत्न स्तुत्यच म्हणावे लागेल.अशा स्वरुपाचे शिकवणी वर्ग प्रत्येक शाळेत घेतले जात असल्याने या विद्यार्थ्यांची इंग्रजी भाषेची भिती निश्चितपणे कमी झाल्याचे दिसुन आले .प्राथमिक इयत्तांमध्ये जरी हे विद्यार्थी पुरेसे समरस होवु शकत नसले तरी पुढील इयत्तांमध्ये त्यांच्या प्रगतीत बदल आढळून येतो ही बाब अशा स्वरुपाच्या शिकवणी वर्गाचाच परिणाम आहे असे म्हणता येईल.

### ६.२) इंग्रजी हस्ताक्षर /वाचन/निबंध स्पर्धा :

आदिवासी जमातीच्या विद्यार्थ्यांना इंग्रजी विषयाचे आकलन योग्य प्रकारे होते का ? याच्या तपासणीकरीता प्रत्येक रविवारी इंग्रजी हस्ताक्षर / वाचन / निबंध स्पर्धेचे आयोजन शालेय पातळीवर केले जाते.या स्पर्धेत सर्व निवासी विद्यार्थ्यांना सहभागी होणे सक्तीचे असते.या स्पर्धेमुळे अनुसूचित जमातीतील विद्यार्थ्यांची इंग्रजी

विषयाबाबत असणारी आकलनक्षमता व प्राप्त ज्ञानाची फेर तपासणी होवून विद्यार्थ्याच्यातील आत्मविश्वास देखील वाढीस लागून आदिवासी विद्यार्थ्यांमधील इतर विद्यार्थ्यांशी संवाद साधण्याची क्षमता बळकट होते.

**६.३) समूह अवांतर वाचन :**

शालेय अभ्यासक्रमाव्यतिरीक्त आदिवासी विद्यार्थ्यांकडून सुटीच्या दिवशी अवांतर वाचन करुन घेतात या समूह वाचनाच्या उपक्रमामुळे आदिवासी विद्यार्थ्यांमधील इंग्रजी भाषेविषयी भिती नष्ट होवून या भाषेच्या माध्यमातून विचार व्यक्त करण्याची क्षमता बळकट होण्यास मदत होते.

**६.४) द्विभाषिक शिक्षक :**

विद्यार्थ्यांना विषयांचे संपुर्ण आकलन होण्यासाठी त्यांच्या बोलीभाषेत त्यांच्याशी शिक्षकांनी संवाद साधणे आवश्यक असते परंतू अनुसूचित जमातीचे शिक्षकांमधील प्रमाण पाहता हे फारसे शक्य होत नाही यावर पर्याय म्हणून इंग्रजी पर्यायी सोप्या भाषेत शिकवण्यासाठी टिंवकल इंग्लिश स्कुल,नागभीड,ता.नागभीड,जि.चंद्रपुर व मातोश्री कमलाताई ठमके इंग्लिश मिडीयम स्कुल, गोकुंदा, ता.किनवट, जि.नांदेड या नामांकित शाळेत द्विभाषिक शिक्षक नेमण्यात आलेले आहेत. इतर नामांकित शाळेत बिगर आदिवासी शिक्षक अनुसूचित जमातीतील विद्यार्थ्यांची बोलीभाषा थोडीफार शिकून घेवून विद्यार्थ्यांशी संवाद साधतात.

**६.५) सांस्कृतिक कार्यक्रम :**

विद्यार्थ्यांचा बौध्दिक विकासासह व्यक्तिमत्व विकास होणे देखील तितकेच आवश्यक असते.पाहणीतील सर्वच नामांकित शाळेत विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यातयेते. गुरूपोर्णिमा, शिक्षकदिन, प्रजासत्ताक दिन,स्वातंत्र्यदिन,जयंती-पुण्यतिथी, क्षारोपन, स्वच्छता अभियान यासारखे सामाजिक बांधिलकी जपणारे उपक्रम राबवितात,प्रभातफेरी आणि दिंडया काढण्यात येतात तसेच पथनाटयाद्वारे जनजागृती घडवुन आणणारे उपक्रम यासर्व शाळांमध्ये राबविले जात असल्याचे आढळून आले. चित्रकलास्पर्धा, काव्यवाचन स्पर्धा, गीतगायन स्पर्धा, वेशभूषा स्पर्धा, वार्षिक स्नेहसंमेलन इ.सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात येतात. त्याचप्रमाणे संस्कृतीची ओळख करून देणारे बैलपोळा, दहीहंडी, रक्षाबंधन सारखे विविध सण-उत्सव साजरे केले जातात. विद्यार्थ्याच्या सहभागाने व शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली अशा कार्यक्रमाच्या आयोजनामुळे



**ओम गुरूदेव इंग्लिश मिडीयम गुरूकुल, कोकमठाण, ता.कोपरगाव, जि.अहमदनगर.**

विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळतो व त्यांच्यातील सभाधीटपणा वाढून त्यांची इतरांशी संवाद साधण्याची क्षमता वाढते.

**६.६) पालक मेळावा** :

बहुतांश नामांकित शाळेमध्ये विद्यार्थ्यांना पालक भेटीसाठी प्रत्येक महिन्यातील चौथा शनिवार किंवा रविवार ठरवून देण्यात आला आहे. तसेच विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती,विद्यार्थ्यांना किंवा पालकांना असणाऱ्या समस्या अशा महत्वपूर्ण बाबींवर चर्चा करण्यासाठी प्रथम सत्राअखेर व द्वितीय सत्राअखेर असे वर्षातून दोनवेळा पालक मेळावा घेतले जातात.या मेळाव्यात शिक्षक पालकांशी संवाद साधतात.

**६.७) क्रिडास्पर्धा :**

आदिवासी मुलांची शारिरिक जडणघडण नैसर्गिकरित्या काटक असल्याने ते क्रिडास्पर्धात अत्यंत आनंदाने सहभागी होतात.बाल्यावस्थेपासून त्यांच्यातील स्पर्धात्मक भावनेला उत्तेजन मिळते यातून कोणत्याही संकटास ते न डगमगता सामोरे जावू शकतात.आदिवासी मुलांचा जीवनविषयक दृष्टिकोन सुधारण्यासाठी अशा क्रिडा प्रशिक्षणाचे व स्पर्धांचे महत्वाचे स्थान आहे. म्हणूनच या शाळांमध्ये क्रिडास्पर्धा घेतल्या जातात. अनुसूचित जमातीचे विद्यार्थी आंतरशालेय, जिल्हास्तरीय, विभागस्तरीय, राज्यस्तरीय स्पर्धेत भाग घेत असल्याचे निदर्शनास येते.या विद्यार्थ्यांमध्ये खेळाडूवृत्ती प्रकर्षाने जाणवते. हे विद्यार्थी खो-खो, कबड्डी, ॲथॅलेटिक्स, थाळीफेक, गोळाफेक यासारख्या मैदानी खेळात सहभागी होऊन यशस्वी झालेले आढळून आले.पाहणीतील बहुतांश नामांकित शाळात विद्यार्थ्यांना स्वसंरक्षणासाठी "कराटे" प्रशिक्षण दिले जाते.राजे छत्रपती मार्शल आर्टस् इंग्लीश मिडीयम स्कुल, पिंपळनेर, ता.साक्री, जि.धुळे या नामांकित निवासी शाळेत विद्यार्थ्यांना तायक्वोंदो, सिकई मार्शल आर्टस्, किक बॉक्सींग प्रशिक्षण देण्यात येते. या स्पर्धेत आदिवासी विद्यार्थ्यांनी जिल्हा, विभागीय व राज्य पातळीवर लक्षणीय यश प्राप्त केले आहे.

**६.८) नृत्य व संगीत शिक्षण :**



**सरस्वती इंटरनॅशनल स्कुल, कुर्तडी, ता.कळमनुरी, जि.हिंगोली**

आदिवासी जमातीच्या विद्यार्थ्यांच्या अंगी उपजतच असणाऱ्या नृत्य व संगीत कलेला प्रोत्साहन देण्यासाठी नामांकित शाळेत प्रयत्न केले जातात. नृत्य व संगीत हे आदिवासींना निसर्गानेच दिलेले प्रथम शिक्षण आहे.जेंव्हा या कलेचे शास्त्रशुध्द प्रशिक्षण त्यांना मिळते तेंव्हा ते अत्यंत उत्साहाने त्यात रममाण होतात.या संदर्भातील अंतरशालेय स्तरावर झालेल्या विविध स्पर्धांमध्ये आदिवासी विद्यार्थ्यांचा सहभाग उल्लेखनीय होता. याशिवाय त्यांनी अनेक पारितोषिके मिळवले

असल्याचे दिसून आले. आदिवासी जीवनशैलीशी तादात्म्यभाव साधून मिळणारे आधूनिक शिक्षण त्यांच्यात चांगला बदल घडवून आणत असल्याचे आढळून आले.

### ६.९) शालेय सहल :

विद्यार्थ्यांच्या सामान्य ज्ञानात वाढीसह मनोरंजन देखील होईल या दृष्टिकोनातून शाळेकडून दरवर्षी शैक्षणिक व पर्यटन सहलींचे आयोजन केले जाते.या सहलींमुळे इतिहास, उत्कृष्ट निसर्ग दर्शन होत असल्याने त्यांच्यात जो उत्साह निर्माण होतो त्यामुळे विद्यार्थ्यांच्या सामान्य ज्ञानाच्या आकलनक्षमतेत सकारात्मक बदल होतो.

### ६.१०) योगाभ्यास :

पाहणीतील सर्व नामांकित शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या दिनचर्येतील पहाटेचा १ तास योगाभ्यासासाठी राखीव ठेवण्यात आल्याचे आढळले याशिवाय मुलांना शास्त्रशुध्द पध्दतीने योगाचे प्रशिक्षण देण्यासाठी पाहणीतील बहुतांश नामांकित शाळेत प्रशिक्षित योग शिक्षक असल्याचे आढळून आले.योगाभ्यासामुळे मुलांमध्ये शारीरीक व मानसिक सुदृढता वाढीस लागेल हे निश्चितच.

### ६.११) शिष्यवृत्ती :

इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळेमध्ये पूर्व उच्च माध्यमिक शिष्यवृत्ती परिक्षा, ऑलिंपिऐड स्पर्धा (इंग्रजी, गणित, सायन्स, सायबर), इंडियन टॅलेंट सर्च परीक्षा, नवोदय, अॅबॅकस, इ.स्पर्धा परीक्षांमध्ये विद्यार्थ्यांना सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन दिले जाते

### ६.१२) विज्ञान प्रदर्शन



**पॅरॉडाईज इंग्लिश मिडीयम स्कुल, आरमोरी, जि.गडचिरोली.**

विज्ञानाची मुलभूत तत्वे शालेय विद्यार्थ्यांना सहज लक्षात येणेसाठी विद्यार्थ्यांमधील सृजनशीलता व कल्पनाशक्तीला वाव मिळविण्यासाठी पाहणीतील सर्वच नामांकित शाळेत विज्ञान प्रदर्शन भरवले जाते.यामुळे त्यांच्यातील तांत्रिक कौशल्य,कारागिरी,सादरीकरण यागुणांना चालना मिळते.आधूनिक विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या संकल्पना, वैज्ञानिक कुतूहल आणि सर्जनशीलता निर्माण होते. बालपणापासुन विज्ञान कळल्यामुळे त्यांच्यातील दृष्टीकोन मजबूत होतो. यातुन सुजाण नागरीक घडण्याची प्रक्रिया नैसर्गिकरीत्याच सुरु होते.

नामांकित शाळेत आदिवासी विद्यार्थ्यांना प्रवेश दिल्यामुळे जो लक्षणीय बदल अनुभवास आला तो म्हणजे विद्यार्थ्यांना विविध स्पर्धांमध्ये भाग घेण्याची मिळणारी संधी होय.या विद्यार्थ्यांचा सर्वच स्पर्धात सहभाग असतो. त्यांना अनेकदा पारितोषिक मिळत नसतील ही पण स्पर्धात्मक परिस्थितीची ओळख होणे हे देखील त्यांच्या व्यक्तिमत्वात सुधारणा होण्याच्या दृष्टिने अत्यंत महत्वाचे आहे.

वरील सर्व बाबींचे अवलोकन करता मूल्यमापन पाहणीतील नामांकित निवासी शाळेत अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांमध्ये इंग्रजीचे ज्ञान वाढवण्याकरीता चांगले प्रयत्न होत असल्याचे निदर्शनास आले.

# प्रकरण — ७

## अडचणी व उपाययोजना

सदरच्या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी खालीलप्रमाणे प्राधान्यक्रम निश्चित करून सुधारणा सुचविण्यात येत आहे.

१) या योजनेत आदिवासी विद्यार्थ्यांना पहिल्या इयत्तेत प्रवेश दिला जातो. ही मुलं त्यावेळेस केवळ सहा वर्षाची असतात.घरच्या सुरक्षित वातावरणातून दूर व आपल्या आईवडीलांपासून वेगळे राहण्याचे या मुलांचे वय नाही. प्रवेशाच्यावेळेस ही मुलं या इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील वातावरणाशी अत्यंत नवखे असतात.त्यामुळे त्यांना या वातावरणाशी जुळवून घेणे कठीण होते. परिणामी ते अभ्यासात व सर्वच बाबतीत मागे पडतात किंवा त्यांच्यात कायमस्वरूपी न्यूनगंडाची भावना तयार होते. सामान्यतः इतर सर्वसामान्य घरातली मुले जेव्हा इंग्रजी माध्यमाच्या शाळेत प्रवेश घेतात,त्यापूर्वी त्यांनी इंग्रजी माध्यमातून लोअर केजी,अप्पर केजी करून अशा स्वरूपाच्या शाळेत आलेली असतात त्यामुळे त्यांचा इंग्रजी माध्यमाचा आधीच पुरेसा परिचय झालेला असतो. मात्र आदिवासी मुले आदिवासी खेड्यापाड्यातून सरळ इंग्रजी माध्यमाच्या नामांकित शाळेत ज्यावेळेस प्रवेश घेतात, त्यावेळेस त्यांना इंग्रजी माध्यम तर सोडाच पण ते मराठी भाषेशी देखील पुर्णपणे परीचित नसतात.त्यामुळे नामांकित शाळेत प्रवेश देण्यापूर्वी या मुलांना एखद्या स्वतंत्र बालवाडीत किमान एक वर्षभर पुरेसे शिक्षण देण्यात यावे.

२) प्रत्येक वर्गात विद्यार्थी निवडतांना त्या इयत्तेतील एकुण सर्वसाधारण गटातील विद्यार्थी संख्येच्या जास्तीत जास्त २५ टक्के किंवा १५ या पेक्षा जी कमी असेल ती निवडावी जेणेकरून आदिवासी विद्यार्थी सर्वसाधण मुलांमध्ये सहजतेने मिसळु शकतील.

३) आदिवासींची स्वतःची एक वैशिष्ट्यपूर्ण जीवनशैली आहे.त्यात वाढलेली मुलं जेव्हा इंग्रजी माध्यमाच्या नामांकित शाळेत पहिल्या इयत्तेत प्रवेश घेतात त्या वेळेस ते त्यांच्या नैसर्गिक जीवनशैलीतून अचानकपणे बाहेर येऊन त्यांना परीचित नसलेली नवीन पद्धतीची जीवनशैली अवलंबावी लागते. या नवीन जीवनशैलीशी ते परिचित नसल्यामुळे त्यांच्या मनात न्यूनगंडाची भावना निर्माण होऊ शकते असे होऊ नये म्हणून वसतिगृहातील मदतनीसाकडून त्यांना सकाळी उठल्यापासून ते रात्री झोपेपर्यंतच्या प्रत्येक बाबींचे योग्यरीतीने प्रशिक्षण देण्यात यावे. यासाठी या मदतनीसाना देखील आदिवासी मुलां/ मुलींच्या बोलीभाषेचे जुजबी स्वरूपात का होईना पण प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. जेणेकरून या मुलांसह हे मदतनीस जास्त सहजगत्या वावरू शकतील.

४) पाहणी करण्यात आलेल्या नामांकित शाळांपैकी काही शाळा वगळता बहुतांश नामांकित शाळांच्या वसतिगृहात असे आढळून आले की,या वसतिगृहातील आदिवासी विद्यार्थ्यांची संख्या बहुसंख्येने आहे व सर्वसाधारण मुले अत्यल्प स्वरूपात वसतिगृहात आढळून आली आहेत. त्यामुळे वसतिगृहात

सर्वसाधारण मुलांसोबत राहून सहजीवनाच्या माध्यमातून संस्काराची संकल्पना यामुळे पूर्ण होत नाही. ही वस्तुस्थिती लक्षात घेता की ज्या शाळांच्या वसतिगृहांमध्ये पुरेशा प्रमाणात म्हणजेच या योजनेअंतर्गत त्या शाळेत प्रवेश देण्यात येणाऱ्या संख्येच्या किमान सर्वसाधारण मुले वसतिगृहात राहत असणे आवश्यक आहे.

५) या पाहणी दरम्यान काही नामांकित शाळांमध्ये या योजनेतील आदिवासी विद्यार्थ्यांची तुकडी वेगळी बसवत असल्याचे आढळून आले. याबाबत विचारणा केल्यावर असे सांगण्यात आले की ही मुले अद्याप सर्वसाधारण मुलांच्या तुलनेत मागे असल्याने त्यांना स्वतंत्ररीत्या प्रशिक्षीत करण्यासाठी ही सोय करण्यात आली आहे. ही बाब या योजनेच्या मूळ उद्देशालाच मारक आहे. अशी परीस्थिती असणाऱ्या सर्व शाळांचा शोध घेऊन संबंधित शाळा असे का करते याच्या कारणांचा देखील शोध घेण्यात यावा व या समस्येवर कायमस्वरुपी उपाय  शोधण्यात यावा.

६) या योजनेतील विद्यार्थी जेव्हा सुट्टी संपवुन परत शाळेमध्ये येतात तेव्हा त्यांना शाळेच्या वातावरणाशी समरस होण्यास थोडा वेळ लागतो,अशी काही मुख्याध्यापकांनी / अधिक्षकांनी व्यथा व्यक्त केली. जेव्हा ही मुले शाळेतून सुट्टीसाठी घरी जातील तेव्हा या विद्यार्थ्यांना पुरेसा गृहपाठ देण्यात यावा व या विद्यार्थ्यांशी संबंधित शिक्षकांनी शक्य झाल्यास संवाद साधावा.

७) या योजनेनुसार विद्यार्थ्यांना पहिल्या इयत्तेत प्रवेश देण्यात येतो. या शाळांत प्रवेश घेणारे विद्यार्थी आदिवासी खेड्यातून सरळ इंग्रजी माध्यमाच्या शाळेत येत असल्यामुळे त्यांना भाषेची फार मोठी अडचण सहन करावी लागते. त्यामुळे पहिली आणि दुसऱ्या इयत्तेत जे  शिक्षक किंवा शिक्षिका या विद्यार्थ्यांना शिकवणार आहेत त्यांना त्या भागातील बोलल्या जाणाऱ्या आदिवासी बोली भाषेचे समजण्यापुरते किमान ज्ञान असणे आवश्यक असावे. आवश्यकता असल्यास या स्वरूपाचे प्रशिक्षण या शिक्षकांना देण्यात यावे त्यामुळे हे शिक्षक या विद्यार्थ्यांच्या अडचणी समजू शकतील व त्यांना समजावून सुद्धा सांगू शकतील. अशा स्वरूपाच्या प्रशिक्षणासाठी उन्हाळयाच्या सुट्टीचा वापर केल्यास ते जास्त संयुक्तिक ठरेल व त्यामुळे शाळेचा अभ्यासक्रम देखील प्रभावित होणार नाही.

८) सामान्यतः पाहणी केलेल्या सर्वच नामांकित शाळांमध्ये असे आढळून आले आहे की प्रवेशाच्या वेळी आदिवासी मुलांची वैद्यकीय तपासणी योग्यरीतीने केली जात नसावी.या आदिवासी मुलांमध्ये त्वचारोग अथवा तत्सम आजारांचा मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव आढळतो. यामुळे या विद्यार्थ्यांसोबत इतर सर्वसामान्य विद्यार्थी मिसळण्यास नकार देतात किंवा या विद्यार्थ्यांचे पालक याबाबत शाळेच्या व्यवस्थापनाकडे नाराजी व्यक्त करतात.यामुळे या आदिवासी विद्यार्थ्यांना काही काळ वेगळे ठेवावे लागते.त्यांच्यावर वैद्यकीय उपचार झाल्यानंतर व आजारातून मुक्त झाल्यावरच त्यांना एकत्र बसवण्यात येते.मात्र अशा प्रकारामुळे योजनेचा मूळ उद्देशालाच बाधा पोहचते. ह्या परिस्थितीत सुधारणा होणे आवश्यक आहे. नामांकित शाळेत प्रवेश देण्याआधी या आदिवासी मुलांची नामांकित डॉक्टरांकडून किंवा जिल्हा

रुग्णालयातील तज्ञ डॉक्टरांकडून संपूर्ण तपासणी करण्यात यावी व ते अशा आजारांपासून मुक्त असल्याची खात्री झाल्यानंतरच त्यांना नामांकित शाळेच्या वसतिगृहात अथवा शाळेत दाखल करण्यात यावे.

९) शाळेतील वास्तव्याच्या काळात जर संबंधित विद्यार्थ्यास एखादा अत्यंत गंभीर स्वरूपाचा आजार आढळून आला तर त्या विद्यार्थ्याच्या वैद्यकीय उपचाराबाबत शाळेने गंभीर असणे आवश्यक आहे. तेव्हा अशा विशेष परिस्थितीत त्या मुलाचे संपूर्ण वैद्यकीय उपचार चांगल्या दवाखान्यात करण्यात यावी व त्या संदर्भातील संपूर्ण खर्च शासनाने करावा यामुळे त्या विद्यार्थ्याचे शैक्षणिक नुकसान होणार नाही आणि अशा आजाराबाबत काळजी घेण्यात शाळा टाळाटाळ करणार नाही यासंदर्भात आदिवासी विकास विभागाने तसे नियम या योजनेत अंतर्भूत करावे.

१०) या योजनेतल्या इयत्ता ५ वीच्या व इयत्ता ८ वीच्या सर्व विद्यार्थ्यांची राज्यस्तरावर एक सामायिक परिक्षा घ्यावी व यामधुन विद्यार्थ्यांना मिळालेल्या गुणांच्या आधारावर शाळेचे मानांकन करण्यात यावे व या वर आधारित शुल्क निश्चितीचे धोरम ठरवावे.

११)पाहणी करण्यात आलेल्या नामांकित शाळांमध्ये बहुतांश शाळांची अशी तक्रार आढळून आली की या योजने अंतर्गत त्यांना मिळणारे अनुदान शासनाकडून नियमितपणे मिळत नाही. याबाबत सर्वत्रच तक्रारीचा सूर अनुभवास मिळाला. ही निश्चितच एक अत्यंत गंभीर बाब आहे. कारण निधी अभावी मुलांची गुणवत्तापूर्ण देखभाल व त्यांना देण्यात येणाऱ्या शिक्षणावर विपरीत परिणाम होऊ शकतो. अनुदान वेळेत मिळाले नाही तर सहाजिकच विद्यार्थ्यांच्या देखभालीवर होणाऱ्या खर्चात काटकसर निश्चितपणे केली जाऊ शकते.आणि अशा काटकसरीची सवय संबंधित संस्थांना झाली तर निधी मिळाल्यावर देखील ते नियमानुसार द्यावयाच्या सुविधेत नेहमीच कपात करु शकतात.त्यासाठी संबंधित प्रकल्प कार्यालयांनी त्यांच्या अखत्यारीतील नामांकित शाळांना निधी नियमित स्वरूपात उपलब्ध होतो किंवा नाही यावर विशेष लक्ष देण्याची गरज आहे.

१२) वसतिगृहात या मुलांच्या जेवणाचा जो आहार ठरवण्यात येतो, तो आहारशास्त्राच्या दृष्टीने योग्य असला तरी त्यातील अन्नपदार्थ आदिवासी मुलांच्या पारंपारिक चवीचे नसतात. त्यामुळे ते जेवण करताना सतत त्यांच्या चवीच्या पदार्थाची मागणी करतात. त्यांना सर्वसाधारण जेवणाची सवय होईपर्यंत त्यांच्या आवडीचा एखादा पदार्थ एखाद्यावेळेस देण्यास परवानगी देण्यात यावी .याशिवाय मुलांच्या आहारात इतर काही पौष्टिक कडधान्ये जसे नाचणी, बाजरी व उडीद अशांचा देखील समावेश करण्यात यावा.

१३) नामांकित शाळांना प्रकल्प कार्यालयातील अधिकाऱ्यानी विशिष्ट कालावधीनंतर नियमित भेटी द्यावयाच्या असतात. अनेक ठिकाणी हे अधिकारी भेटी देखील देतात मात्र या भेटीतून आदिवासी मुलांच्या शैक्षणिक दर्जा किंवा त्यांच्या वसतिगृहातील राहणीमानात सुधारणा करण्यासंदर्भात या अधिकाऱ्यांकडून आढावा घेतला जातो अथवा सूचना दिल्या जात असल्याचे आढळून आले नाही.ही

बाब या शाळांच्या भेटीदरम्यान निरीक्षण नोंदवह्यांतील नोंदींची पाहणी केली असता आढळून आले. त्यात अत्यंत सर्वसामान्य स्वरूपाचे शेरे लिहिले असल्याचे दिसून आले.या भेटी वेळी अधिकाऱ्यांकडून काही गुणवत्तापूर्ण कार्यवाही व्हावी अशी अपेक्षा आहे.

१४) या योजनेच्या अभ्यासाच्या वेळी अशी वस्तुस्थिती अनुभवास मिळाली की,काही नामांकित शाळांमध्ये दाखल करण्यात आलेले विद्यार्थी ती शाळा ज्या प्रकल्प कार्यालयाच्या क्षेत्रात आहे त्यापेक्षा वेगळ्या प्रकल्प कार्यालयातील विद्यार्थी प्रवेशित करण्यात आलेले आहेत. या परीस्थितीचा परिणाम खालील प्रकाराने अनुभवास आला.

विद्यार्थ्यांचे गाव ज्या प्रकल्प कार्यालयातच्या क्षेत्रात येते त्यापेक्षा वेगळ्या प्रकल्प कार्यालयाच्या क्षेत्रातील शाळेत त्यास प्रवेश देण्यात आल्यास शाळेपासून त्याचे गाव बऱ्याच अंतरावर असू शकते. इयत्ता १ली मधील विद्यार्थ्याचे वय लक्षात घेता या विद्यार्थ्यांमध्ये साहजिकच असुरक्षिततेची भावना निर्माण होते तसेच विद्यार्थ्यांच्या पालकांमध्ये देखील अशीच भावना निर्माण होत असल्यामुळे ते विद्यार्थ्यांना जवळच्या शाळेत दाखल करुन घेण्यासाठी सतत प्रयत्नशील असतात. याशिवाय या योजनेंतर्गत दाखल झालेल्या विद्यार्थ्यांना दिर्घकालीन सुटीच्या वेळेस त्यांच्या गावी पोहचवणे व सुटी संपल्यानंतर पुन्हा शाळेत आणण्याची जबाबदारी शाळेची आहे. अशा दूर अंतरावर असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शाळांना विनाकारण अतिरीक्त खर्चाचा बोजा सहन करावा लागतो. त्यामुळे सामान्यत: योजनेंतर्गत अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना प्रवेश देताना नामांकित शाळेची निवड ही अपर आयुक्त कार्यालयांतर्गत न करता प्रकल्पा अंतर्गत करण्यात यावी.

उपरोक्त वस्तुस्थिती लक्षात घेता या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी उपरोक्त बाबींसंदर्भात योग्य समन्वय व संनियंत्रण असणे गरजेचे आहे.

